नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

डिसेंबर

१९६२

★

ल्य ५० न. पैसे

या अंकात

* प्रा. बी. आर. आष्टीकर
* प्रा. भ. प्र. मोहरीर
* प्रा. म. ना लोही
* राजनकुमार, बी ए. (ऑ)
* कुसुमानंद
* कृष्णा चौधरी
* सुधीर देव
* प्रभाकर गणपतराव तलारवार
* म. ना. श्रीखंडे

शिवाय, संपादकीय,

परिचय–परामर्श, पत्रव्यवहार, संघवार्ता इ०

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक:- प्रा. श्री. मा. कुलकर्णी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

:: संपादक मंडळ ::

भा. श्री. परांजपे
व. कृ. वऱ्हाडपांडे
मा. गो. वैद्य

युगवाणी

संपादक:—श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १७] डिसेंबर १९६२ [अंक ८

युध्यस्व विगतज्वर :

तुवां शरीरपरां नोहावें । कामनाजात सांडावें
मग अवसरोचित भोगावे । भोग सकल ॥
आतां कोन्ंड घेऊनि हातीं । आरूढ पां इए रथीं
देइ आलिंगन वीरवृत्ती । समाधानें ॥
जगीं कीर्तितें [illegible]त्रीं । स्वधर्माचा मानु वाढवी
येया भारा पासौनि सोडवी । मेदिनी हे ॥
आता पार्था निःशंकु होई । एया संग्रामा चित्त देइ
एथ हें वाचूनि कांही । करूं नैए ॥

—ज्ञानेश्वरी अ. ३ ओव्या १८५ ते १८८

[तूं शरीरपर होऊं नयेस. सर्व इच्छांचा त्याग करावा आणि मग प्रसंगोचित असे सर्व भोग भोगावेत. आता धनुष्य हातीं घेऊन या रथावर आरूढ हो आणि समाधानाने वीरवृत्तीस आलिंगन दे (वीरवृत्तीचा स्वीकार कर). जगात आपली कीर्ति रूढ कर. स्वधर्माचा (क्षात्रधर्माचा) मान वाढव. आणि या (दुष्टांच्या) भारापासून पृथ्वीला मुक्त कर. अर्जुना आता निःशंक हो. या युद्धाकडे लक्ष दे. या प्रसंगीं युद्धाशिवाय कांहीहि करणें योग्य नाही.]

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

शुभलेखन व शुद्धलेखन

मागच्या महिन्याच्या आरंभी सातारा येथे भरलेल्या ४४ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष माननीय श्री. न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ यांनी शुभलेखनाच्या आवश्यकतेवर आपल्या भाषणात भर दिला व शुद्ध-लेखनाचा प्रश्न बहुतांशी मिटला याबद्दल समाधान व्यक्त केले. श्री. काकासाहेबांच्या या दोन्ही मताशी आम्ही सहमत आहोत.

अश्लील म्हणून जे ओळखले जाते त्याच्या संदर्भातच व तेवढ्या पुरतेच शुभलेखनाचे आवाहन आहे असे मात्र नव्हे. अपशब्द, दुरूत्तरे, अकारण पारुष्य, निंदा–टवाळी, खोचक–बोचकपणा इ. सर्वांचा समावेश अशुभ-लेखनात होतो व ते टाळून केलेले लेखन तेच शुभलेखन होऊ शकते.

वाणीचे अवगुण म्हणून ज्ञानेश्वरांनी पुढील १३ गोष्टींचा उल्लेख केला आहे—

उरोधु[1] बाडुबलु[2] । प्राणुपापता[3] ढालु[4] ।
उपहासु[5] चालु[6] । वर्मस्पर्शु[7] ॥
आटु[8] वेगु[9] विंदाणु[10] । आशा[11] शंका[12] प्रतारणु[13] ।

(१–उपरोधिक किंवा परस्पर विरोधी २–महाभयंकर ३–प्राणभेदक ४–वाहवलेली ५–टर उडविणारी ६–छलयुक्त ७–वर्मास झोंबणारी ८–हट्टी, कठिण ९–गडबडीने उच्चारलेली, आवेशपूर्ण १०–कपटाची, दगाबाज ११–आशाळूपणाची १२–संशयात पाडणारी १३–फसवेपणाची) या सर्व अवगुणांचा त्याग जिने केला आहे तीच वाणी शुभ म्हणता येईल. वाणीच्या या सौजन्याचा संबंध अर्थातच मनाशी आहे. अंतर शुद्ध असेल तरच वाणीहि शुचि राहील. ज्ञानेश्वरांनी सर्वत्र वाणीच्या सौजन्यावर भर दिला आहे. ज्ञानी पुरुषाचं ते अेक लक्षण त्यांनी मानलं आहे. हा ज्ञानी पुरुष कसा बोलतो ? तर–

पुढां स्नेह पाझरे । मागा चालति अक्षरें
शब्द पाठिं अवतरें । कृपा आधी ॥

बोलण्याच्या आधी तो असा विचार करतो की माझा बोल कोणाला खुपणार तर नाही ना ? बोलताना कांही अधिक उणं निघून गेलं तर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोणाच्या वर्मी लागेल. कोणाला शंका वाटेल. कोणाला पीडा होऊं नय, कोणाची भंवई उचलूं नये अशी त्याची भावना असते म्हणून तो उगाच असतो. मग कोणी बोलण्याविषयी प्रार्थना केलीच तर बोलतो. पण कसा ?

> कां नादब्रह्मचि मुसें आले । की गंगापय असललें
> पतिव्रतें आलें । वार्धक्य कां ॥२६८॥
>
> तैसें साच आणि मवाळ । मितलें परि सरळ
> बोल जैसें कल्लोळ । अमृताचे ॥२६९॥
>
> अ० १३

(त्याचे बोलणें म्हणजे जणू काय नादब्रह्मच आकार धरून आलें (असें मधुर) किंवा गंगेचें पाणी उसळलें (असें पवित्र) अथवा पतिव्रतेला जसे कांही म्हातारपण आलें आहे. त्याप्रमाणे खरें आणि कोणास न खुपणारें, मोजकें परंतु सरळ, त्याचें बोलणें म्हणजे जशा कांही अमृताच्या लाटाच.— श्री. दांडेकर)

वाणीचे सौजन्य व त्या पाठीमागील मनाची मृदुता व शुद्धता ही या प्रकारची असावी लागते. या साठीहि तप करावे लागते. असें 'वाङमय तप करणारे 'तपस्वी' साहित्यिक किती आहेत ?

शुद्धलेखन हीहि महत्वाची बाब आहे. दुर्दैवाने आज भाषेच्या लेखनशुद्धीकडे कांहीशा गौणत्वाने व उपेक्षेने पाहिले जात आहे. या उपेक्षेच्या मुळाशी जाणतनेणत अेक अपसमज वास करीत आहे. अमुकच भाषा, उच्चार वा लेखन शुद्ध का म्हणून म्हणावयाचे ? अशी अविक्षेपाची वृत्ति दिसून येत आहे. मूठभर शिष्टांच्या तोंडची किंवा त्यांनी शुद्ध म्हणून ठरविलेलीच शुद्ध का व बहुजनसमाजाची ती अशुद्ध का अशी पृच्छा अनेकांच्या मनात उद्भूत झाली आहे. व क्वचित ती जनातहि व्यक्त होते. लोकशाहीच्या चुकीच्या समजुतीवर हे सर्व उभे आहे असे आम्हाला वाटते. भाषेची, उच्चाराची वा लेखनाचीहि शुद्धता ही मुळात सांकेतिक आहे. तिच्यात श्रेष्ठ व कनिष्ठ भाव नाही. असे संकेत ठरविण्याची पात्रता अर्थातच 'शिष्टांची' असते. परंतु प्रश्न शुद्धतेचे संकेत कुणी ठरवायचे हा नसून अशा संकेतांची आवश्यकता आहे की नाही हा आहे. सर्वांना सर्वकाळी (निदान दीर्घकाळपर्यंत) विशिष्ट भाषा कळावी हे जर इष्ट व आवश्यक असेल तर मग भाषेचे (उच्चारांचे व लेखनाचे) एक सर्वमान्य व सर्वसामान्य (म्हणजेच मध्यवर्ती) स्वरूप असणे आवश्यक आहे. अशा स्वरुपाशी जुळणारी ती शुद्ध व न जुळणारी ती अशुद्ध हाच व अेवढाच अर्थ भाषेच्या बाबतीत शुद्धाशुद्धतेचा आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उपरोक्त अपसमज दूर होऊन सर्वांनी भाषेच्या शुद्ध उच्चारांकडे व शुद्ध लेखनाकडे आस्थेने लक्ष पुरविले तर भाषेच्या उच्चारण–लेखन–शुद्धीचा प्रश्न समाधानकारकपणे सुटू शकेल व या बाबतीत योग्य ती प्रगति होईल असा विश्वास वाटतो.

मराठी साहित्य महामंडळाने मराठीची एकच लेखनपद्धति निश्चित करुन व महाराष्ट्र राज्य सरकारने तिला मान्यता देऊन या क्षेत्रातील अराजक दूर करण्याला फार मोठी मदत केली आहे. नव्या नियमावलीत कांही उणीवा नाहीत अगर मतभेदाला जागा नाही असे म्हणण्याचे कारण नाही. परंतु 'इथून तिथपर्यंत मराठीची लेखनपद्धति एकच' हा फार मोठा व महत्वाचा टप्पा गाठला गेला आहे, हे ध्यानात घेतले पाहिजे. आणि सर्वांनी या नियमावलीचा अंगिकार व वापर आस्थेने, जाणीवेने व दक्षतेने केला पाहिजे.

श्री ज्ञानेश्वर पुण्यतिथि आणि गीता जयन्ति

> एया गीताशास्त्राची थोरी । स्वयं शंभु विवरी
> जेथ भवानी प्रश्णु करी । चमत्कारौनि ॥
>
> तेथ हरू म्हणे जेवि नेणिजे । देवी जैसें का स्वरूप तूझें
> हें नित्यनूतन देखिजे । गीतातत्त्व ॥

गीतातत्त्व नित्यनूतन आहे. परंतु मानवजात विस्मरणशील व स्खलनशील असल्यामुळे तिला या तत्त्वज्ञानाचा वारंवार विसर पडतो. व तिचा अध:पातहि होतो. म्हणूनच ते तत्वज्ञान वारंवार उपदेशिण्याची आवश्यकता असते. हे ओळखूनच श्री ज्ञानेश्वरांनी सर्वाधिकारैकपवित्र व औदार्य आगळा वेद असणाऱ्या या गीतार्थाला–मराठीत आणून सोडलं. गीतार्थ मराठीत आणण्याची ही परंपरा महाराष्ट्रीय विद्वानांनी आधुनिक काळापर्यंत अखंड चालू ठेवली. याचा परिणाम व प्रभाव मराठी समाजाच्या आचार-विचारावर आजहि दिसण्यासारखा आहे.

> पडता जडभारी । दासें आठवावा हरी

या उक्तीप्रमाणे आज राष्ट्राला हरी व हरिगीता आठवणे स्वाभाविक आहे. हा आठव मन:पूर्वक असो व चिरकाल टिको हीच श्री ज्ञानेश्वर पुण्यतिथीच्या व श्रीमभ्दगवद्गीता जयन्तीच्या निमित्ताने भगवंताच्या चरणी विनम्र प्रार्थना !

–श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वामन व ध्वनि

लेखकः– प्रा. मधुकर रघुनाथ आष्टीकर

काव्यात मुख्यत्वेकरुन काय असावे ? काव्याला सौंदर्यलाभ व सहृदयाल्हाददायित्व प्राप्त करवून देणारे ते तत्व कोणते ? ह्या बाबत विचार करताना, संस्कृत काव्यशास्त्रात वामनाने प्रथमच 'आत्मा' हा शब्द वापरून 'रीति' नामक काव्यसौंदर्यतत्वाला त्या आत्मत्वाचा मान दिलेला आढळतो. 'रीतिरात्मा काव्यस्य !' असे तो स्पष्टपणे सांगतो.

त्याच्या रीतितत्वाचा त्याच्याच विचारांच्या सहाय्याने अभ्यासात्मक विचार करण्यापूर्वी, आपण त्याने वापरलेल्या 'आत्मा' ह्या शब्दाचा विचार करावयास हवा. तो शब्द रूपकात्मक आहे का ? शरीर व त्यात चैतन्य निर्माण करणारे ब्रह्मतत्व, आत्मतत्व, तद्वत् काव्य व त्यात सहृदयाल्हाददायित्व निर्माण करणारे रीतितत्व असे हे रूपक वामनाला अभिप्रेत आहे का ?

त्याच्या वृत्तिवरुन तरी तसे स्पष्ट दिसते. तो म्हणतो. "रीतिर्नाम इयमात्मा काव्यस्य । शरीरस्येवेति वाक्यशेषः ।" म्हणजे काव्य हे शरीर झाले व रीति हा आत्मा झाला. पण वामनाच्या विचाराने काव्य कशाला म्हणावे ? गुणालंकारसंस्कृत अशा शब्दार्थाला काव्य म्हणावे असे तो म्हणतो. "काव्य-शब्दोयंऽ गुणालंकारसंस्कृतयोः शब्दार्थयोः वर्तते ।" म्हणजे गुण व अलंकार ह्यांनी युक्त असे जे शब्दार्थ त्यांना तो काव्य म्हणतो. अर्थात् शरीर व आत्मा मिळूनच बनणाऱ्या वस्तूला काव्यसंज्ञा दिलेली आहे. वामनाच्या मते रीति हा काव्याचा आत्मा आहे. तेव्हा ह्या आत्म्याचे स्वरूप आपण पाहू. "विशिष्टा पद-रचना रीतिः । विशेषो गुणात्मा ।" ह्या दोन सूत्रांच्या द्वारे वामनाने रीतीचे स्वरूप वर्णिले आहे. त्यावरुन स्पष्ट दिसते की "गुणवती पदरचना ।" म्हणजे रीति. आता वामनाच्या मते काव्याचे शरीर कोणते ? काव्याची वरील व्याख्या देतानाच वामन म्हणतो' "लक्षणेने केवळ शब्द व अर्थ ह्यांनाच काव्य म्हणतात" अर्थात् हे शरीर आहे.

आता अडचण अशी की शब्द व अर्थ जर शरीर आणि विशिष्टा म्हणजेच गुणवती पदरचना जर आत्मा तर, पद-शरीराचा भाग, अवयव–व गुण–हे त्याचे विशेषण–तर अवयवालाच विशेषण लावून त्याला आत्मत्व देणे किंवा त्यालाच आत्मा म्हणणे कितपत सयुक्तिक आहे ? पुढे वामन गुणाची व्याख्या करताना

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणतो की गुण हे शद्व व अर्थ ह्यांचे धर्म होत. "ये खलु शद्वार्थयोः धर्माः काव्यशोभां कुर्वन्ति ते गुणाः।" मग ह्या अवयवांचा धर्म आत्मा कसा ?

पुढे एके ठिकाणी तर वामनाने विचित्रच कोलांटी उडी घेतलेली दिसते. तो म्हणतो "एतासु तिसृषुरीतिषु रेखासु इव चित्रं काव्यं प्रतिष्ठितम् इति ।" अता इथे रेखा–चौकट–बाह्य शरीर–स्थूल तत्व–ह्याचा आरोप रीतीवर केलेला आहे. म्हणजे "रीति" बाह्यदेह किंवा शरीर कल्पिलेले आहे. व त्यात काव्य चित्राप्रमाणे दृग्गोचर होते ते आणखी कुण्यातरी तत्वामुळे असा स्पष्ट इशारा लाभलेला आहे. केवळ रेखा म्हणजे चित्र नव्हेच ! तसेच केवळ रीति म्हणजे ते काव्यतत्व नव्हेकी ज्यामुळे 'काव्यत्व'––(शद्वार्थांना) प्राप्त व्हावे. पदरचना अशा काही रीतीने व्हायला पाहिजे की ज्यामुळे ते तत्व चित्रासारखे–त्यात व त्यातूनच–स्पष्ट व्हावे व त्या शद्वार्थांना काव्यसंज्ञा यावी. काव्यत्वमूल असे ते तत्व शद्वात सांगता येत नाही पण शद्वांची विशिष्ट रचना केल्यास ते सहृदयांना त्यात चित्रासारखे प्रतीत होऊ शकते.

तेव्हा आत्मा हा शद्व शरीर व आत्मा ह्या रूपकानुसार वापरलेला नसून केवळ 'मुख्यतत्व' किंवा काव्यानंददायी असे तत्व असाच अर्थ घ्यावा लागेल. पण इथे दुसरा प्रश्न असा निघतो की जर रीति हे आत्मतत्व म्हणजे सौंदर्यतत्व मानले तर वामनाच्या मताप्रमाणेच रीति म्हणजे केवळ गुणवतीपदरचना असे मानून चालणार नाही. (पण वामनच तसे म्हणतो !) तर गुणालंकारवती पदरचना म्हणजे रीति असे म्हणावयास पाहिजे. कारण असे न म्हटले तर वामनाच्याच पूर्वविधानाला बाध येतो. वामनाने आधी म्हटले आहे की सौंदर्य म्हणजे 'गुणालंकारादानत्वम्' । गुण व अलंकार ह्यांच्या स्वीकारानेच काव्यात सौंदर्य येते. किंवा दुसऱ्याहि प्रकारे ह्याच मुद्याचा विचार केला तरी हे कळेल की रीतीची व्याख्या–'मुख्यतत्व' ह्या दृष्टीने किंवा 'सौंदर्य तत्व' ह्या दृष्टीने अव्याप्त आहे. कारण ती त्याच्याच पूर्वमताला बाधक आहे. "काव्यं ग्राह्यं अलंकारात्" । म्हणजे काव्यातील मुख्यतत्व–आनंदतत्व–सौंदर्यतत्व किंवा आत्म-तत्व म्हणा–म्हणजे अलंकार. आणि हा अलंकार म्हणजे सौंदर्य. सौंदर्य-मलङ्कारः । आणि सौंदर्य म्हणजे दोष टाकून गुणालंङ्.कारस्वीकार. "स दोष–गुणा–लङ्कार–हानादानाभ्याम्" तेव्हा ह्या गुणालङ्कारस्वीकारासाठी वापरावयाचा एकच शद्व म्हणजे जर रीति (कारण ती सौंदर्यतत्व, आत्मतत्व आहे) तर तिचीहि व्याख्या केवळ गुणांचा नव्हे तर अलंकारांचाहि अंतर्भाव करणारी पाहिजे.

बरे आणखी पुढे गेल्यास अधिकच नवलसृष्टि दृग्गोचर होते. वामन म्हणतो "रीतीरात्मा काव्यस्य ।" रीति काव्याचा आत्मा. मग म्हणतो ह्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रीति तीन प्रकारच्या. म्हणजे आत्मे ३ प्रकारचे. म्हणजेच ह्या तीन पैकी कुण्याहि एका प्रकाराचा अवलंब केला तरी काव्य सुंदर होते, ग्राह्य ठरते, रमणीय वाटते. पण पुढे लगेच वामन म्हणतो, "तासां पूर्वा ग्राह्या गुणसाकल्यात्" । ह्या तीनरीतीपैकी फक्त पहिलीच ग्राह्य आहे. म्हणजे तीन आत्म्यांपैकी दोन आत्मे निष्क्रीय ठरले ! नव्हे वामन म्हणतो की त्या दोन रीति अगदीच निरूपयोगी आहेत. केवळ सवयीसाठी सुद्धा त्याचा उपयोग होऊ शकत नाही. प्रथम रीतिखेरीज इतर दोन रीति (गौडी व पात्र्चाली) रचणे म्हणजे गोणपाट विणणे होय. आता रीतिरात्मा काव्यस्य म्हटले तर जशी वैदर्भी काव्याचा आत्मा तशाच गौडी व पात्र्चाली सुद्धा काव्याचा आत्मा होतील. पण वामन त्यांना अजिवात स्थान देत नाही. मग रीति हा काव्याचा आत्मा हे सामान्य विधान अतिव्याप्त झाले ! केवळ वैदर्भी रीति हाच काव्याचा आत्मा हाच वामनाच्या मताचा निष्कर्ष !

आता गौडी व पात्र्चाली ह्या रीति ग्राह्य नाहीत हे विधान जमेस धरता आणखी काय काय घोटाळे होतात ते पाहू या.

'ओज: कान्तिमती गौडीया ।' व 'माधुर्य सौकुमार्योपपन्ना पात्र्चाली ।" म्हणजे ओज, कान्ति, माधुर्य व सौकुमार्य हे गुण स्वतंत्रपणे व एकेकश: काव्यानंद देण्याच्या दृष्टीने ग्राह्य नाहीत. त्यांची रचना व गोणपाटवीण सारख्याच मोलाची होय. पण हे गुण वैदर्भीतहि आहेतच पण तिथे ते इतर सहा गुणावरोवर आहेत. मग काय त्यांना त्या सहा गुणामुळे तिथे गुणत्व आले ? एरव्ही तर ते दुर्गुणच आहेत ! मग वैदर्भी ग्राह्या ती केवळ उरलेल्या सहा गुणामुळेच काय ? ते सहा गुणच काव्याचा आत्मा मानायचे काय ? (वामनाच्या मते)

वरे केवळ ह्या गुणावावत विचार करावा तरी मति अधिकच कुंठित होते. दोषाच्या उलट ते गुण व गुणाच्या उलट ते दोष अशी वामनाची गुण-दोष व्याख्या आहे. "विपर्ययात्मानो" असा तो शद्ब वापरतो. ज्या घटकांचा मिळून गुण होतो त्याच घटकाच्या उलट घटकांचा मिळून दोष होतो. असे आहे तर मग "गाढबंधत्वमोज : ।" म्हणून ओजो गुण सांगून "तद्विपर्ययात्मा"– (म्हणजेच त्याच्या अगदी उलट असलेला) "शैथिल्यं प्रसाद:" नामक,-वास्तविक दोष,–तो गुण म्हणून प्रतिपादितो. मग गुणदोपांची व्याख्या वर प्रकारे का केली ? वामन म्हणतो, ह्या प्रसाद गुणाला (वास्तविक दोपाला) गुणत्व, त्याचे ओजोगुणाशी एकत्व पावून प्राप्त होते. आता गुणात जर दोष मिळवले तर पूर्वी होता नव्हता तोहि गुण दूषित होण्याचीच निश्चिती, नवा गुण निर्माण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होणे तर स्वप्नसंभवहि नाही. पण वामन तर म्हणतो की दोषाचे प्रमाण अधिक ठेवून केवळ दुसरा गुण तोंडी लावला की निराळाच एक गुण निर्माण होतो !" क्वचित् ओजस : प्रसादात् उत्कर्षः । ह्यात प्रसाद हा ओज गुणाच्या विपर्यय-स्वरुप म्हणून वास्तविक वामनाच्या व्याख्येनुसार दोषच आहे !

वरील विविध प्रकारच्या विसंगतींचा अपहार करावयाचा असल्यास वामनाच्या ह्या ग्रंथाकडे निराळ्या दृष्टिकोनातून पहावयास पाहिजे.

वामनाने रीतितत्वाच्या आधारे काव्याचे उत्तम आणि अवर असे दोन भेद केलेले आढळतात. वैदर्भी ही रीति म्हणून जरी संबोधिलेली आहे तरी ते एक तत्व आहे असे मानले पाहिजे. (ते कसे ते पुढे आलेलेच आहे.) ह्या तत्वानुसार काव्याचे उत्तम व अवर असे दोन भेद वामन करतो. "समग्र गुणोपेतत्वम्" हे तत्व (म्हणजे वैदभी रीति) उत्तम काव्यलक्षण ठरते. स्तोकगुणत्व (गौडी व पाञ्चाली रीति) अवर काव्यलक्षण ठरते. ही नांवे देशावरुन दिलेली नसून त्या देशोद्भव काव्यावरून दिलेली आहेत असे वामन सांगतो. म्हणजे काव्य डोळ्यापुढे ठेवून, त्यातील सौंदर्यधायक तत्व शोधून समग्र गुणोपेतत्व जर आढळले म्हणजेच सर्व दृष्टया उत्तम काव्य वाटले तर तो काव्याचा उत्तम प्रकार असे त्याचे म्हणणे. ते समग्रगुणोपेतत्व—म्हणजेच सर्वदृष्टया सर्वोत्तम असल्याचे लक्षण त्याला वैदर्भीय काव्यात आढळले. 'ते' तत्व त्याला—की जे तत्व नसले तर "वाङमधु" स्रवत नाही—मग शद्व असले, अर्थ असला व्याकरणादि सर्व सिद्धता असली तरी—शद्वार्थात न गवसणारे पण त्या विशिष्ट पदांच्या रचनेमुळे त्या शद्वार्थातून स्रवणारे आनंददायी वाङ्‌मधुत्व प्रतीत करणारे ते तत्व त्याला विदर्भातील कवींची काव्य वाचून मनात भरले. तेच श्रेष्ठ होय ही त्याची खात्री झाली. त्याला त्यान समग्रगुणोपेतत्व वहाल केले. व त्या कवींची, तों वाङमधु त्या, शद्वात न गवसणाऱ्या, तत्वाद्वारे प्रतीत करून देणारी जी विशिष्टा पदरचना तिला त्याने वैदर्भी नांव दिले. —इतर देशातील काव्ये वाचून त्याला हा वाङ्‌मधु प्रतीत झाला नाही. त्याला त्याने अवर काव्य म्हटले. त्याची पदरचना—त्याने त्या देशाच्या नांवानुसार गौडी व पांचाली ह्या नांवाने संबोधिली.

म्हणूनच वामनाच्या रीति ह्या शद्वाचा अर्थ 'ते' सौंदर्यतत्व असा करावा लागतो. विशिष्ट सौंदर्यतत्व युक्त काव्यरचनापद्धति म्हणजे रीति. वैदर्भी रीति—हे एक असेच सर्वश्रेष्ठ सौंदर्यतत्व आहे हे वामनानेच ह्या रीतीच्या स्तुतीपर उल्लेखिलेल्या ह्या श्लोकावरून स्पष्ट होते—

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"तामेतां एवं कवयः स्तुवन्ति।" असे तो म्हणतो व रीतीचा स्त्रीलिङ्गी उल्लेख करतो. पण श्लोक कुण्यातरी तत्वाची स्तुति करीत आहे हे त्यातील नपुंमकलिङ्गी सर्वनामावरून स्पष्ट दिसते.

सति वक्तरि सत्यर्थे सति शद्वानुशासने।
अस्ति तन्न विना येन परिस्रवति वाड्.मधु ॥

अर्थात ही स्तुति वामनाने केलेली नाही; इतर कवींनी केलेली आहे व वैदर्भी रीतीची नव्हे तर त्या वेगळयाच एका तत्वाची केलेली आहे. पण वामनाने ती 'वैदर्भीची' म्हणून उद्‌धृत केली व त्यात त्याने दोन गोष्टी साधल्या.

(१) वैदभी रचना ही 'तें' तत्व अनुस्यूत असलेली तत्तत्ववती रचना होय. (२) "रेखासु चित्रमिव रीतीपु आत्मा" ह्या वाक्यानुसार–हा 'ते तत्व' रुपी आत्मा ह्या रीतीत, रेषेतूनच चित्र प्रतीत व्हावे तसा प्रतीत होतो.

वामनाला हे जे तत्व विदर्भदेशीय काव्य संभारात आढळले–की ज्याचे स्वरूप इतर कवींनी वरीलप्रमाणे गायिले ते स्वरूप वामनालाहि चट्‌दिशी पटले व त्याने तन्महतीपर म्हणून उद्‌धृतहि केले–ते तत्व म्हणजे आनंद-वर्धनाने धडाडीने उघड उघड पुरस्कारिलेले व ध्वनि म्हणून संबोधिलेले व्यग्यतत्वच होय.

सति वक्तरि सत्यर्थे सति शद्वानुशासने ।
अस्ति तन्न विना येन परिस्रवति वाड्.मधु ॥

जे नसले तर–जरी शद्व व अर्थ व त्याच्या विभक्तियोजनादीचे ज्ञान असले तरी तो वाड्.मयातील आनंद त्यातून स्रवत नाही, वाच्यार्थाहून भिन्न पण त्यातूनच स्रवणारा हा आनंद त्या एका तत्वामुळे आहे. अर्थात् ते म्हणजेच व्यग्यतत्व–ध्वनितत्व होय. शद्वानुशासनाने व वाच्य-वाचकांच्या ज्ञानाने अलंकारादि साध्य आहेत म्हणून त्यांचा उल्लेख 'तत्' ने नाही. गुणादि शव्दार्थाधीनच म्हणून त्यांचाहि उल्लेख 'तत्' ने नाही. मग 'ते' आहे काय ? ते शद्वार्था पलीकडले आहे पण शद्वार्थ असतानाच व त्यातूनच स्रवणारे आहे व स्रवण होते ते आनंदाचे. तेव्हा हे ध्वनितत्वच होय. वामन त्याचीच स्तुति करतो. व म्हणतो की ही वैदर्भीची स्तुति होय. म्हणजेच वैदर्भीय शैलीत हे 'ध्वनितत्वं' असते व तेच श्रेष्ठ आहे. तोच आत्मा आहे कारण वैदर्भी' काव्याचा आत्मा आहे. फक्त नांवात फरक आहे. 'ध्वनि' नव्हे तर वैदर्भी'.

(पृष्ठ २३ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लावणीकार सगनभाऊ

लेखक:– प्रा. भ. प्र. मोहरीर

अध्यात्म व आख्यान यांच्या दिशेने मराठीत संत कवितेची निर्मिति झाली. पुढे वेदान्ताचा क्षुण्ण मार्ग सोडून मराठी काव्याने एक नवे माध्यम शोधले. तीच मराठीतील शाहिरी कविता होय. या कवितेतून पोवाडे व लावण्या यांचा उद्भव झाला. पेशवाईच्या उत्तरकाळात लावण्यांचा उदय होऊन शृंगार व वीर रसाची पाणपोई उघडली गेली. ऐतिहासिक दृष्टया अगीनदासाचा अफझलखानावरील पोवाडा हा शाहिरी कवितेचा प्रारंभ असून मराठी लावणीची उत्क्रांति येथूनच झाली.

लावणी–सुभग रचनेचा आकृतिबंध

महाराष्ट्र सारस्वतकार म्हणतात त्याप्रमाणे पोवाडा व लावणी ही शौर्य–शृंगाराची प्रतीके असली तरी ती अन्योन्य शोभाजनकच होत' मराठी भाषेचे व संस्कृतीचे अस्सल रूप या दोन्ही प्रकारातून परिस्फुट झालेले असून महाराष्ट्राच्या लौकिक जीवनाचा शृंगारिक आविष्कार लावणी. वाङ्‌मयातून प्रकर्षाने झालेला आढळून येतो. वीर आणि शृंगार हे दोन्ही रस पौरुष गुणांवर अधिष्ठित आहेत. महाराष्ट्राच्या ऐतिहासिकतेचे आणि राष्ट्रीयतेचे ठळक प्रतिबिंब लावणीवाङ्‌मयातून व्यक्त झालेले आहे 'लावणी म्हणजे सुभग रचनेचा आकृतिबंध'. हृदयाला चटका लावणारी ती लावणी ही व्याख्या सर्वमान्य होण्यासारखी असली तरी ती शास्त्रीय मात्र नाही. शेतात लावणी करताना म्हटले जाते ते लावणी–गीत होय असे म्हणणेहि अपर्याप्तच आहे. कारण ते लोकगीत असले तरी कृषिगीत मात्र नव्हे. लावणी म्हणजे लापनिका असे म्हणणेहि दूरान्वयमूलकच आहे. अर्थबोध होईल अशा रीतीने जुळणी करणे हे लावणीचे प्रयोजन व उद्दिष्ट असून शृंगारवृत्तीचा व विषयाचा उत्कट आविर्भाव लावणी वाङ्‌मयातून होतो. डफगाणे, गोंधळ, भराड, विराण्या गौळणी इत्यादि मराठी काव्यप्रकाराशीच हा प्रकार संबद्ध आहे. सर्वसामान्यांच्या मनोरंजनाकरिता त्यांना सुचतील अशा लौकिक, पौराणिक वा आध्यात्मिक विषयावर रचलेली, कडे व ढोलकी यांच्या तालावर, विशिष्ट ढंगाने म्हटलेली खटकेबाज, सफाईदार जातिरचना म्हणजेच लावणी होय. शृंगारदर्शन हाच लावणीवाङ्‌मयाचा हेतु असला तरी लावण्यात विविध

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विपय आढळतात. ग्राम्यता, शृंगार व गेयता ही लावण्यांची तीन लक्षणे होत पण लावण्यांच्या भाषेत ग्राम्यतेपेक्षा व ग्रामीणतेपेक्षा नागरतेचेच प्रावल्य अधिक आहे. आध्यात्मिक व धार्मिकतेपेक्षा लौकिकाचाच अधिकार मोठा आहे. शृंगार, रंगविलासाप्रमाणे वेदान्ताचे व कूटप्रश्नाचे ब्रम्हजालहि भेदिक लावण्यातून डोकावते. मराठी संतांनी महाराष्ट्रात आध्यामिक लोकशाही प्रसृत करून ब्रम्हविद्येचा सुकाळ केला तर लावणीकारांनी जनरंजनाच्या हेतूने शृंगारजलाची पाणपोई उघडली. या लौकिक लोकशाहीच्या वारसदारात सर्व थरांचा व जातीचा मांदीमेळावा जमलेला आहे. शाहीरात उच्चवर्णीयापासून गवळी, तेली, तांबोळी, आतार, शिकलगार इत्यादींनी अहमहमिकेने भाग घेतला व समाज-रंजनाच्या या माध्यमाला हातभार लावला. शाहिरी काव्याचे तीन कालखंड होतात. स्वराज्य स्थापनेपासून पानपतच्या युद्धापर्यंतचा कालखंड. पानपतपासून स्वराज्य–नाशापर्यंतचा व अव्वल इंग्रजीचा कालखंड. तिसरा कालखंड हा मराठी सत्तेचा व मराठ्यांच्या मर्दुमकीचा ऱ्हासकाल होय. मराठीतील प्रथितयश लावणीकारांनी मराठेशाहीच्या व पेशवेशाहीच्या भरभराटीची, विस्ताराची व ऐन उत्कर्षाची चित्रे जशी रेखाटली त्याचप्रमाणे मराठ्यांच्या व पेशव्यांच्या अवनतीचीहि दारुण व दुर्धर दृश्ये चितारली.

सगनची मराठीनिष्ठा व संप्रदायनिष्ठा

सगन हा जातीने मुसलमान. इतर लावणीकारांप्रमाणे तोहि मराठी संस्कृतीशी व मराठी राज्याशी समरस झालेला होता. मराठमोळा चालीरीतीचा, आचारविचारांचा, पोषाख वेषादिकांचा तपशील त्याने यथार्थतेने व आत्मीयता पूर्वक लावण्यातून निवेदन केलेला आहे. महाराष्ट्रातील देव–दैवतांचा विधर्मी असताना देखील त्याने आदरपूर्वक निर्देश केलेला आहे. पंढरपूर व विठ्ठल यांच्या भक्तिभावात तो रंगून गेलेला होता व महाराष्ट्रनिष्ठेचा आविष्कारहि त्याने भक्तिभावपूर्वक केलेला आहे. त्याची संप्रदाय–निष्ठा प्रखर होती. 'ज्ञानेश्वरांची ओवी जनीचा अभंग कोणी तरी गा रे' असे तो हळहळून म्हणतो. लौकिक विषयावर सगनभाऊने ज्याप्रमाणे लावण्या लिहिल्या त्याप्रमाणे त्याचे ऐतिहासिक पोवाडेहि सुपरिचित आहेत. पानपतचा पोवाडा व खडकीची लढाई हे त्याचे दोन ऐतिहासिक पोवाडे होत. सगन हा मुसलमान असल्यामुळे त्याच्या उत्कट व आत्यंतिक मनोवृत्तीचा प्रभाव त्याच्या लावणी–लेखनावरहि झालेला आहे. लावणी या प्रकारावर खऱ्या अर्थाने फारशीचे व यावनी संस्कृतीचे मूर्धर्वतित्व आढळते. इ. स. १३१८ पासून इ. स. १६५६ पर्यंत महाराष्ट्रावर मुसलमानांचे राज्य होते. या काळात हजारो फारशी शद्ब मराठीत घुसले. शाहीर, तमाशा, कलगीतुरा, इत्यादि शद्बहि फारसी भाषेतीलच होत. शाहीर म्हणजे कवि.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तमाशा म्हणजे प्रेक्षणीय दृश्य. कलगी व तुरा ही शिरोभूषणाची नांवे. ही सर्व फारशीची मराठीला मिळालेली देणगी होय.

शृंगारभावनेचे अधिराज्य

उर्दू–फारशीतील शाहिरी–मुशाहिरीचे लावणीशी नाते अधिक जवळचे. विषय व वृत्ति या दोहोंच्याहि बाबतीत ते निकटचे आहे. मुशाहिऱ्याप्रमाणे लावणी वाङ्मयात रंगेल रसिकतेप्रमाणे कलंदर धिटाईहि आहे. इष्काच्या कैफात व बेहोषीत मश्गुल असलेल्या समाजाला लावणीचे बोल प्रमाथी व प्रमादी वाटावेत यात नवल नाही. सगन भाऊच्या लावण्यात त्याच्या अभिजात शृंगार–विलासाचा व सुरत चेष्टितांचा नवनवोन्मेष आढळतो. "सगनभाऊच्या कवनावरती फंदी लोक झुरती" हे त्याचे आत्मोद्गार आत्मविश्वासाचे जसे द्योतक आहेत तसेच तत्कालीन लोकाभिरुचीचे गमक आहेत. शृंगारभावनेच्या आत्यंतिकतेमुळे सगनच्या लावण्यात शृंगारचेच अधिराज्य आहे. कांही कांही ठिकाणी तो उत्तान शृंगारात फारच रमतो असाहि टीकाकारांचा अभिप्राय आहे. पण शृंगाराच्या बाह्य वर्णनापेक्षा प्रेमच्या मनोभावनेलाच सगनने जास्त प्राधान्य दिलेले होते. सगनभाऊच्या लावणीची लावण्यवेल शृंगारजलाने थवथवलेली आहे. गहिऱ्या व सांद्र प्रीति–फुलांनी ती डवरलेली आहे.

दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत सुगनभाऊची प्रसिद्धि झाली. आणि आपला प्रतिस्पर्धि होनाजी बाळ याचेशी तो चुरशीचे सामने देऊ लागला. बाजीरावाबरोबर पेशवाई हादरल्यावर पेशवाईच्या नाशाचे वर्णन करीत त्याने सातारकर महाराजांचा आश्रय मिळविला. छत्रपतीच्या गादीच्या नाशाचे वर्णन करण्याचे त्याच्या नशिबी आले. इ.स. १८४ मध्ये तो मरण पावला.

"होनाजीचा झाला चुना"

लोकसमूहासमोर लावणी म्हणून त्यांच्याकडून विदागीची अपेक्षा करावयाची यामुळे शाहिरात स्पर्धा सुरु झाली. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत सगनभाऊ लावणीकार म्हणून प्रसिद्धि पावल्यामुळे तो आपला प्रतिस्पर्धि होनाजी बाळ याच्याशी चुरशीचे सामने देऊ लागला. "होनाजीचा झाला चुना" असे आव्हान त्यांनी लावणीतून दिलेले आहे. "सगनभाऊ म्हणे होनाजी बाळा उत्तर द्यावे रोकडे" असा सवाल त्याने केला. सगनभाऊच्या लावण्या रागदारीच्या व विकटचालीच्या व होनाजीच्या साध्या व गोड. पण सगनभाऊच्या लावण्या सर्व शृंगाराने भरलेल्या असून त्यां उत्तान अर्थास अनुलक्षून साधलेल्या आहेत. म्हणून अज्ञ जनांस विशेष प्रिय आहेत असे संग्राहक शं तु. शालिग्राम यांनी एकेठिकाणी म्हटले आहे. दुसरा बाजीराव राज्य करीत असताना लावणी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणणारी मंडळी वरीच उदयाला आली. बाजीरावांच्या पूर्वी तमाशाचा क्रम थोडाच असून त्या कलेची पूर्णता बाजीराव साहेबांच्या कारकिर्दीत झाली. बाजीरावांच्या कारकिर्दीत शुक्रवारातून चालले तर माडीवरून दोन प्रहर रात्री साळू मैनाचे जे सूर गोड लकेऱ्यात पूर्वी ऐकू येत होते ते हळुहळू बंद होऊन एकदम डफावर थाप पडली. फडाचे तमाशे सुरु झाले व लावण्याचे निनाद उचंबळू लागले. मुलुखगिरीत गुंतलेल्या, संसारात शिणलेल्या वा विलासात आंवलेल्या मनाला विरंगुळा देण्याकरिता मराठी मनाच्या अंतरंगात नवा रंग व नवा जोष भरण्याकरिता शाहिरांनी लावण्या रचल्या. शाहिरी संप्रदायानुसार सगनभाऊच्या लावण्याची घडण शृंगारिक आहे. त्यांच्या लावण्यात शृंगार भावनांचे नाजुक व गहिरे विलास प्रियकराने लावलेली ओढ व उत्कंठा व प्रेयसीच्या मनातील द्वंद्व, अभिलाषा वियोग, विरहभाव आविष्कृत झालेले आहेत.

काव्यमय सवालजबाब

'चंद्राचें चांदणें शीतळ का उष्ण' या कवनाची सुरुवातच मोठी कल्पना-रम्य आहे. सगनच्या नायिकेचा हा प्रश्न कूट व चमत्कृतिपूर्ण आहे. साजणाने त्याला काव्यमय उत्तर दिलेले आहे. नायिका पृच्छा करते––"चंद्राचें चांदणें शितळ का उष्ण प्राणपति, ते सांगा मजप्रती कल्पना डोळ्यामधि खुपती"––त्यावर नायकाने उत्तर दिले, "आपण सीतळ असल्यास प्रभा चंद्राची सीतळ दिसती, आपण उभयता उष्ण कल्पना मनि वसती" पण एवढ्यावर प्रेयसीचे समाधान व्हायला पाहिजे ना ! ती चंचळ बावरी सख्याला अति आदराने पुन्हा प्रश्न करीत आहे. 'ती तांत्रिक लक्षणें प्रितीची चतुरा परि वस्ती, राव बाजीचे शहर नमुना पुणें ग्राम वस्ती, अहोरात्र अहोदिवस होती, इष्काची कुस्ती, अर्ज-विनंती पहिली, मी उभी कर जोडून, गुणग्राहक गुण पाहतां आले ब्रह्मपुरी सोडून, राव सवाई समशेर ठेविले चित्ती ताडून, लाजून बसले भिडून जडु दे लाडलीला मोती "या साजणाने भरजरीचा शुभ्र पोषाख केलेला आहे. मस्तकावर सिरपेच तुरा झळकत असून कंठाच्या ठिकाणी भिकबाळिचा चौकडा झोक विराजमान झालेला आहे. हिरव्या पाचूचे सैल निळीचे लोलक पदतळ भूषवीत आहेत. जडावाच्या कंकणामुळे रत्न जडित कर झगमगत आहे. असा शहर वडोद्याचा छबिला पाहून ही नायिका चटकचांदणी बनली आहे. व लंपट पाखराप्रमाणे या स्वरुपावर मी भोवती भोवती फिरत राहीन अशी आर्जवं करीत आहे. 'तुम्ही गुलाबाचें फूल व मी पिवळी शेवंती' असे सांगून 'रतीं सुखसंतोषेंहि तनु माझा सांभाळ करा म्हणून प्रियकराला गळ घालीत आहे. वेदरची कामसेना व दौलताबादेचा साबाजी अनंत यांची ही चमत्कृतिपूर्ण कथा सगनने रसाळपणे सांगितली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मदनवाधेने पीडा पावलेली कामसेना रागरागिण्यांचा आलाप जेव्हां आळवूं लागली त्यावेळी जंगल हरणांचा थवा त्या कामिनी जवळ जमा झाला. कामसेनेने आपल्या गळयातील हार हरणाच्या गळयात घातला व दरवारात फौजफिर्याद गुदरली. 'तिचा हेत असलेल्या सावाजी अनंताने पंजा धरतांच तिचा मदन उतरला व सगनने आपल्या नाथसंप्रदायाला अभिवादन केले.

दोन वायकांचा दादला सवतीसवतीचे भांडण लावून आपण मौज पाहत नामानिराळा राहिला, याचें चटकदार वर्णन 'निवाडा' या लावणींत आहे. 'मुशाफिरांतील' नायकाने एका तरुणीच्या सौंदर्यावर मोहित होऊन प्रीतीची आगळीच तऱ्हा अवलंविली आहे. 'नार चंचल मनीं घावरी' या लावणीत मर्दानी पोपाख परिधान करून प्रियकराला भेटायला जाणारी मुलखावेगळी नायिका आहे. 'आले माहेरचे पत्र' या लावणीची रचना भावगीतासारखी. माहेरच्या आठवणींचा गोडवा तीमधून ओसंडत आहे. 'फंदी फाकडे तुझं छंदी' लावणीत रस्त्यावर दोन्ही वाजूंनी नाकेवंदी करावी लागली असे अतिशयोक्तीने म्हटले आहे !

मऱ्हाटी वळण मऱ्हाटी जीवन याचे सहजदर्शन

सगनच्या लावण्यातील मराठमोळा शृंगार मनाला मोहविणारा आहे. या लावण्यात अतिशयोक्तीची व अतिरंजनाची खरी वहार आहे. लावणीकार हे खऱ्या अर्थाने कलावंत असतात. कलावंतांना नैतिक संवेदना नसतात या समजुती-प्रमाणे लावणीकारांच्या कल्पनासृष्टीत लौकिकाचे प्रतिवंध नाहीत. सगनची मूळचीच कल्पक व कलंदर प्रतिभा लावणी वाङ्मयाच्या क्षेत्रात वारेमाप उधळू लागल्यास नवल नाही 'नांव तुझं साळु' या लावणीत नांव तुझं साळू, चल आज खेळू, उभि दारि नार नखऱ्याची, चाल तुझी मराठमोळयाची या प्रमाणे प्रियकर प्रेयसीचा अनुनय करीत आहे व त्याची परिणति प्रीतिमीलनात होत आहे. "नार सजनाचा पदर धरून गाइ सगनचाल करून प्रीति उभयता मजवर ममता असावी या प्रभुरायाची चाल तुझि मराठमोळयाची !" 'नटुनथटुन चालशी' या लावणीची सुरुवात 'नटुनथटुन चालशी रोखनको मारू नैनाचे वोलणे मंजुळ मैनेचे' या प्रमाणे आहे "रंभपात्रा दिसे परंतु परोपरी सजली, चाले ठुमकत चमकत विजली" "मृदु मृदु मंजुळ भाषण जणु अवसान गायनाचे वोलणें मंजुळ मैनाचे" याप्रमाणे आहे. मैनाचे हे शारीरिक लावण्याचे लावणीतील चित्रण सांकेतिक व सर्वपरिचित आहे. सगनभाऊने लावणीची अखेरी एखाद्या नैष्ठिक भावुकाप्रमाणे केलेली आहे. "सगनभाऊचें कवन अमोलिक नाथसांप्रदाचें फोडलें मडकें रंगाऱ्याचें" ही त्याची सांप्रदायिकता येथेहि प्रचीतीला येते. या लावण्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तत्कालीन जीवनातील शृंगाररस प्रधान प्रसंगावर व स्त्रीपुरुषसंबंधावर रचिलेल्या आहेत. यातील वर्णनातून उपमातून व प्रतिमातून मऱ्हाटी वळण व मऱ्हाटी जीवन याचेच सहजदर्शन घडते. तत्कालीन लोकजीवन त्यांच्या आवडीनिवडी, प्रचलित सौंदर्यसंकेत वेषभूषा, अलंकार यांचाच संदर्भ लावणीवाङ्मयातून शोधता येतो. लावण्या शृंगारप्रवण तर आहेतच त्याबरोबर त्या उपदेशप्रवण आहेत. सगनच्या लावण्यात नीतिबोध, व हितबोधहि आढळतो. 'असी फिरे प्रित वाढल' या लावणींत नायिका नायकाला हितोपदेश करीत आहे. ती म्हणते—'भाउबंद सोईरे गणगोतात असावा ठसा, उगवला सूर्य गगनी जसा' 'दुपारची सावली नाही, धनदौलतीचा भरवसा काळ कंठावा कसा !

शाहिरी परंपरेचा मानकरी लावणीकार

लौकिक व्यवहाराप्रमाणे राजाश्रय व धन्याच्या आश्रयावरहि सगनभाऊने कवने लिहिली. एका पोवाड्यात धन्याचा आश्रय तुटल्याचे तीव्र दुःख सगनभाऊने आणखी एका पोवाड्यात गायिले. आश्रिताच्या दुःखचेंच त्यात आविष्करण आहे. पेशव्यांच्या अवनतीची चित्रें त्याने रेखाटली. छत्रपतीच्या आश्रयाला गेल्यानंतर त्याने पानिपतचा पोवाडा लिहिला. छत्रपतीचीहि रावबाजीप्रमाणे स्थिति झाल्यानंतर सगनभाऊ हळहळून म्हणतो 'राजा कुणीकडे प्रजा कुणीकडे, जरिपटक्याचा हत्ती आमुचा रुतला गाळांत'. सगनभाऊ बघत होता. अवघे राज्य करी न लढाई, खंडणी देती बहादुर इंग्रजाला !"

मराठी कवितेतील शाहिरी परंपरेचा एक मानकरी सगन याने लिहिलेल्या लावण्या मोजक्या असल्या तरी त्याचे मूल्य मोठे आहे. सगनभाऊची लावणी ही 'इष्टत्वाची' असून ती कवीची प्रसंगीची कविताहि आहे. छेलवटाऊ मोहनाराणीच्या इष्काची जोडी सगनभाऊने वर्णून गरती व सभांगना यांच्या प्रीतिभावनेची विविध चित्रे त्याने रेखाटली. 'इष्कयार मतवाल्यांचें मन' या दर्दांतच शांतिसुख पावलेले आहे. म्हणून प्रीतीच्या मंत्राची एक घुटीच सगनभाऊने रसिकांना बहाल केलेली आहे. आपल्या कवितेतील शृंगार रसाचा व प्रेम-रसाचा महिमा त्याने आपल्या एका लावणीत गायला आहे. प्रेमरसाच्या गोडीमुळे आकाशातील पिकलेला आंबा खाली गळून पडला आहे. बागबगीच्या मधील फुलझाडांचा द्रव्य रथ किंवा गाडी या लोकेषणांचा हव्यास राहिला नाही. लावणींतील रंगरसामुळे नारळ, फणस, ताडमाड इत्यादि देखील गुणी सगनभाऊचे मसले गाऊ लागले. शृंगाराचा व प्रीतिभावनेचा निर्जीवावर जर एवढा प्रभाव तर सचेतन मानवांची स्थिति कशी बरे वर्णन करावी ?

(नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ही रात मधू बरसात प्रेमळे करते !!!

ही रात मधू बरसात प्रेमले करते
कामना मनी ग हलते
निशिगंध होऊनि धुंद दरवळे छान
दरवळे हरवते भान

रोहिणी चंद्रमौलनी बावरी झाली
कमलिनी प्रमोदे फुलली
माधुरी लता लाजरी चंद्रिका हंसते
तव गाली खळी ग पडते

यामिनी प्रीतमोहिनी कोमले गाते
प्रेमिका प्रीतमा मिळते
आनंद भरे उन्मद तुझ्या ग नयनी
अनुराग विलसतो वदनी

ही ओढ लागली गोड कुणाची सांग
रोमांच नटविते अंग

—राजनकुमार, बी. ए. (ऑ)

गहिवर—

संसाराच्या अंगारात
करपले भावविश्व
आणि झाला अर्धमेला
माझा संघर्षात जीव

काळोखाच्या उर्शावर
कड फेरतसे व्यथा
ओलांचिव गहिवर
दाटे पापण्यात आता

—कुसुमानंद

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ओढ

पापण्यांना ओढ
तुझ्या लांब क्षितिजाची
काळ्या मध्यरात्री
अधीमधी जागण्याची

शद्ध होऊनिया जळ
गारठे वाऱ्यात
पाउलांचे ठसे काळे
उठती दारात

गात्रगात्र ठणकत
झेपावतो वारा
अंतराचे वेध घेते
तुटणारी तारा

भोवळून गरगरा
फिरे अंतराळ
चाहुलीच्या पदस्पर्शे
शहारते जळ

खोलखोल कुठेतरी
जाळणाऱ्या झळा
आता मात्र साहवेना
दूरतेच्या कळा

पापण्यांना ओढ
तुझ्या लांब क्षितिजाची
काळ्या मध्यरात्री
अवेमधे जागण्याची

—कृष्णा चौधरी

मंदिर

काव्यदेविचे मंदिर मी असे आकारीन
गाभाऱ्यात गभीर स्थिरावेल शुद्धमन.
तपस्येचा पायवा तिच्या स्मृतिस अभंग
नाही ढळता ढळेल आक्रोशले मेघनाद.
सप्तपदांचा सोपान त्याची नाजूक घडण
पदपद पुढारता झंकारेल सा–रे–ग–म.
शब्दप्रतिमांची लेणी गुंफलेली घुमटात
मूर्ति नाचतिल किती एक एक आवारात.
नाच नाचता बोलेल शब्दमूर्ति लयीत
ऐकता, पाउलांची प्रगटेल स्थिरखूण.
बोल एकाच शब्दाचा घुमुनिया गाभाऱ्यात
सारे विश्व स्थिराविल देहमान मावळून.
माझ्या नेत्राची पणती तुडंबुनि अनुभूति
सदा तेवत राहील नाही अंधारेल दीप्ति.

–सुधीर देव

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आवाज

ये कोठुनि आवाज
भ्रमे मम चित्त असे कां आज ॥ धृ० ॥

खाली वरती उंच अंबरी
विशाल वृक्षांच्या शाखेवरी
किंवा गिरिच्या ह्या माथ्यावरि
अस्थिर नजर फिरे का आज ॥१॥

क्षणात इकडे क्षणात तिकडे
काय असे हे अद्भुत कोडे ?
होई मन का ऐकुन वेडे ?
सोडुनि सर्वहि लाज ॥२॥

आकारातुनि निराकार हा
अंतःस्फूर्तीने स्रवतो हा
अनंत जीवा मार्गप्रदिप हा
चढवो नव नव साज
भ्रमे मम चित्त असे का आज ॥३॥

—प्रभाकर गणपतराव तलारवार

सहवास

भाव मदीरा प्राशून
धुंद तुझ्यात जाहले
तुझ्या प्रमाच्या लाटेत
गात्र गात्र स्फुरावले
ओठ ओठांनी झाकता

राग लटकाच आला
निळाईच्या नवलाने
गळा माझा वहरला
मंद आठवण आता
गाठ घालून बसली

विरहाची सांजवात
हृदयात पाजळली
क्षण कालाच्या मोहात
माझे मीच हरवले
भाव वलयांचे स्वप्न

हुंकारांनी ओलावले
पापण्यांच्या काठावर
कथा जिवाची बसली
तुझ्या सहवासासाठी
वेडावली...मुरझली !

म. ना. श्रीखंडे, वरूड

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक टिपण–

सुखान्तिका की सुखात्मिका ?

प्रा. म. ना. लोही

कॉमेडी (Comedy) या इंग्रजी शब्दासाठी मराठीत सुखान्तिका आणि सुखात्मिका हे दोन्ही पर्याय वापरण्यात येतात. इंग्रजीत कॉमेडी हा शब्द इतक्या व्यापक अर्थाने वापरला जातो की त्याला दोन्ही मराठी शब्द सहज लागू पडतात. तथापि, कॉमेडी या शब्दाचा खरा अर्थ सुखान्तिका हा नसून सुखात्मिका हाच होय. Comedy of Manners किंवा Comedy of Fun या दोन्ही प्रकारांसाठी सुखात्मिका हाच पर्याय योग्य नव्हे का ? सुखात्मिका ही सामान्यतः सुखान्तिका असते. मात्र सुखान्तिका ही सुखात्मिका असेलच असे नाही. म्हणून शब्दांचा वापर करताना त्यांचा संपूर्ण अर्थ लक्षात घेऊनच करण्यात यावा असे लेखक नम्रपणे सुचवू इच्छितो.

ट्रॅजेडी (Tragedy) या शब्दासाठीहि दुःखान्तिका व दुःखात्मिका हे पर्याय-वाची शब्द वापरले जातात. वस्तुतः एखाद्या नाटकाचा शेवट दुःखपूर्ण होणे वेगळे आणि नाटकाचा आत्माच तसा असणे वेगळे ! खाडिलकरांचे सत्त्वपरीक्षा हे नाटक सुखान्त असले तरी सुखात्म म्हणता येणार नाही. विद्याहरण तर दुःखात्म आणि दुःखान्तहि आहे. शेवटी होणाऱ्या मृत्यूमुळेच कोणतेहि नाटक दुःखान्त ठरत नाही किंवा मृत्यु नसल्यामुळे सुखान्त ठरत नाही हे खरेच ! म्हणजेच नाटकाची जात ठरवताना नाटककाराचा हेतु आणि नाटकाची फलश्रुति लक्षात घ्यावयाच्या असतात. त्याचप्रमाणे नाटकाचे स्वरुप निश्चित करतानाहि नाटककाराचा हेतु आणि कथावस्तूचा परिपोष लक्षात घ्यावयास पाहिजे. या दृष्टीने भावबंधन हे नाटक विचारार्ह आहे. एक चांगली कॉमेडी निर्माण करण्याच्या हेतूने गडकऱ्यांनी हे नाटक लिहिले. पण हे सुखान्त नाटक पूर्णांशाने सुखात्म आहे काय ? मला तरी तसे वाटत नाही. म्हणून नाटकाचे स्वरुप लक्षात घेऊन पर्यायवाची शब्द वापरावा असे माझे मत आहे. एकापरीने प्रहसन हे सुखात्म आणि सुखान्तहि असते. कॉमेडीचे तसे नाही. अत्र्यांची 'साष्टांग नमस्कार' आणि 'लग्नाचीबेडी' ही सुखात्म नाटके आहेत. उलट घराबाहेर हे सुखान्त नाटक असले तरी सुखात्म खासच नाही. याची दखल आपण घ्यावयास नको काय ?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तसे पाहिल्यास प्रहसन (Farce) आणि सुखात्मिका (Comedy) यात कमालीचे अंतर असते. प्रहसनातील प्रलोभन * (Appeal) उथळ, क्षणिक आणि मर्यादित असून जीवनदर्शन अस्पष्ट, अस्फुट आणि अपूर्ण असते. दोहोंचा दर्जा आणि परिणाम यातहि अंतर असते. वस्तुतः प्रहसन म्हणजे नाटक नव्हे. मुळात पूरक म्हणून त्याचा जन्म झाला. केवळ मनोरंजन हाच त्याचा हेतु. सुखात्मिकेचे तसे नाही. सुखात्मिकेतील व्यक्तिदर्शन सुसंबद्ध आणि वास्तवनिष्ठ असून प्रलोभन (Appeal) व्यापक असते. जीवनदर्शन सखोल आणि प्रत्ययकारी असते. म्हणून प्रहसन आणि सुखात्मिका यांची गल्लत करण्यात येऊ नये. येथे हे लक्षात घ्यावयास पाहिजे की Farcical Drama आणि Comedy या एक नव्हेत.

कांही नाटके अशी असतात की त्यांचा शेवट सुखदायी किंवा आनंदायी झाला तरी वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या मनात दुःखाची जाणीव कायमच असते त्यांच्या मनावरचा भार हलका झालेला नसतो. परंतु चांगल्या सुखात्मिकेचे हे लक्षणच असते. 'ओठात हसू व डोळ्यात आसू' अशी प्रेक्षकाची अवस्था करील तीच चांगली सुखात्मिका होय, असे मेरिडिथने म्हटलेच आहे. हसवता हसवताच जीवनाचा गंभीरपणे विचार करावयास लावणे हे सुखात्मिकेचे प्रमुख लक्षण होय. उलट, कांही नाटकांचा शेवट सुखपर्यवसायी होत नसला तरी ती नाटके सुखात्म असतात. 'तुझें आहे तुजपाशीं' हे नाटक असेच आहे. अलिकडे तर मराठी नाटकांची प्रकृति गंभीर आणि करुण असते. त्यामुळे त्यांची वर्गवारी करताना लेखकाचा हेतु आणि आशयाभिव्यक्तीचे स्वरुप लक्षात घेऊन त्यांना सुखात्म अगर शोकात्म ठरवावे. केवळ शेवट पाहूनच त्यांना सुखान्तिका किंवा शोकान्तिका म्हणू नये. किंवा पर्यवसानाचाच विचार करावयाचा झाला तरी त्यांचा परिणाम लक्षात घेतला जावा.

Comedy साठी श्री. वा. ल. कुळकर्णी यांनीहि सुखात्मिका हाच शब्द योजिला आहे. (पहा—सत्यकथा, फेब्रुवारी १९५८ चा अंक) तोच शब्द औचित्य पूर्ण आहे असे मला सुचवावयाचे आहे. कारण सर्वच सुखान्तिका या सुखात्मिका असतातच असे नाही. मात्र सुखात्मिका या बहुधा सुखान्तिका असतात.

* हा शब्द मानसशास्त्राच्या शब्दकोश तयार करणारे प्रा. वाडेकर यांचा आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परिचय-परामर्श

खुणेची पाने

(ले. डॉ. सरोजिनी बाबर प्रकाशक, श्यामकान्त बनहट्टी, सुविचार प्रकाशन मंडळ, धनतोली, नागपूर १, ४६१/१० सदाशिव, पुणें २. पृष्ठे १५२, मूल्य चार रुपये.)

डॉ. सरोजिनी बाबर यांनी आजवर प्रबंध, कथा, कादंबरी असे विविध वाङ्मय निर्माण केले आहे. 'मराठीतील स्त्रीधन' हा त्यांचा प्रबंध उल्लेखनीय आहे. 'खुणेची पाने' हा त्यांच्या २१ गद्यलेखांचा संग्रह आहे. प्रकाशकांनी यांना 'लघुनिबंध' म्हटलेले असले तरी 'गद्य लेख' म्हणणेच अधिक योग्य व समर्पक होईल असे मला वाटते.

'रत्नाकर' मासिकातून १९२५ साली गुजगोष्ट या नांवाने जो लेखन-प्रकार प्रा. ना. सी. फडके यांनी नव्याने सुरू केला त्याला पुढे लघुनिबंध हे नांव प्राप्त झाले व नंतर 'ललित निबंध' असे त्यालाच म्हणण्यात येऊ लागले. त्या प्रकाराला 'ललित निबंध' हेच नांव समर्पक आहे व तेच रूढ व्हायला पाहिजे. या ललित-निबंधाला फारसे रेखीव तंत्र नसले तरी आरंभापासून तो आतापर्यंतच्या गेल्या ३५-३६ वर्षांत विविध लेखकांनी त्याला अेक विशिष्ट आकार दिला आहे व तो प्रा. फडक्यांच्या मूळ कल्पनेला व आविष्काराला धरूनच आहे. या 'आकारा'चे लघुता हे अेक केवळ बाह्य लक्षण आहे. तेवढ्या-वरून कोणत्याहि 'लघु गद्यलिखाणाला' ललित निबंध म्हणता येणार नाही. ललित निबंधाचा खरा गाभा लेखकाच्या वृत्तीत, भूमिकेत व शैलीत आहे. वृत्ति खेळकर, भूमिका मित्राची व शैली सुललित असेल तरच ते लिखाण ललित निबंध या सदरात पडेल. पुन्हा त्यातील 'मी' व 'माझे' हे कांहीसे 'खरे' तर कांहीसे 'काल्पनिक' म्हणजेच 'कलात्मक' असावयाला हवे. याचाच अर्थ असा की त्यात मांडलेले विचार व मते हे लेखकाचे खरेखुरे, बुद्धीला पटलेले असे असत नाहीत, असण्याची जरूरी नाही. एक प्रकारची 'कृतकता' सर्वत्र हवी. सत्य नको, सत्याचा आभास हवा.

या दृष्टीने प्रस्तुत संग्रहातील लिखाणाकडे पाहिल्यास ते ललित निबंध (पूर्वीचा लघुनिबंध) या सदरात बसत नाही. यातील लिखाणातहि 'नांवे गांवे' गाळली असली किंवा बदलली असली तरी त्यातील 'मी' खरा 'मी' च आहे,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यातील विचार व मते लेखिकेची, कलात्मक नव्हे तर सत्यच मते आहेत. आणि मुख्य म्हणजे लेखिकेची भूमिका गप्पागोष्टीने रिझविण्याची नाही तर अनुभवांनी शिकविण्याची आहे.

हे लिखाण 'ललितनिबंध' या सदरातील नाही याचा अर्थ ते चांगले नाही असा होत नाही. त्याचे स्वरूप व भूमिका वेगळी आहेत अेवढेच मला दाखवायचे आहे. लेखिका सामाजिक कार्य करणारी, त्यात गोडी असणारी व समाजातील खालच्या थरातील स्त्रियांची उन्नति झाली पाहिजे अशी तळमळ असणारी आहे. त्याच क्षेत्रात वावरत असताना तिला जे विविध अनुभव आले, व्यक्तींचे जे अनेक नमूने आढळले, त्यांच्यात जे दोष दिसले त्या सर्वांचे दर्शन घडवून सार्वजनिक क्षेत्रात वागावे कसे हे शिकविण्याची लेखिकेची भूमिका व इच्छा या लेखातून स्पष्ट दिसते.

ही भूमिका असली तरी सर्वच लेखांचे स्वरूप सारखे नाही. त्यात विविधता आहे. कांहीतील अनुभव घरी—दारी आलेले तर कांहीतील समजा जीवनात मिळालेले, कांही बरे, कांही वाईट असे आहेत. पण ही विविधता केवळ अनुभवांची नाही. मांडणीचं स्वरूपहि वेगवेगळं आहे. उदा. 'स्वामी विवेकानंदांचा काळ' या लेखात कांही मुले आपल्या काकांच्या आज्ञेनुसार त्यांच्या वहीतील विवेकानंदांच्या लिखाणातील उतारे वाचीत असताना लेखिका तेथे जाते व त्यात भाग घेते अशा पद्धतीने विवेकानंदांचे कांही मौलिक विचार मांडले आहेत. तर 'समाज चित्रें' या लेखात एका पाठोपाठ अेक असे आपल्या अनुभवाला आलेले कांही व्यक्तींचे नमूने त्या त्या प्रसंगासह लेखिकेने वर्णिले आहेत. 'स्नेह संमेलन' व 'ही माणसंहि बोलतात या दोन लेखात खेडुत स्त्रियांच्या मेळाव्यात लेखिकेला गवसलेलं त्यांचं अंतःकरण, घडलेलं दर्शन व मिळालेला आनंद तिने वर्णिला आहे. 'घरगुति माणसं' यात स्वतःच्या घरी मोलाने कामाला राहिलेल्या स्त्री—पुरुष नोकरांचे बरे वाईट नमूने जिव्हाळ्याने लेखिकेने वर्णिले आहेत व तेहि स्मृतिचित्रासारखे. 'ज्ञानदेवी आणि मी' या लेखाचे स्वरूप निबंधाला अधिक जवळचे आहे तर ज्याच्यावरून या संग्रहाला नांव मिळालं आहे त्या 'खुणेची पाने' या लेखाचं स्वरूप ललित निबंधाला साजेसं आहे. या सर्वाहून वेगळं स्वरूप आहे 'माझं घर' या लेखाचं. लेखिकेनं लोक-गीतांची शब्दसंपत्ति कहाणीच्या रूपात मांडली आहे आणि त्या गद्याला यमकानुप्रासाने एक ठेका, एक लय प्राप्त करून दिली आहे.

लेखिकेची भाषा साधी, अर्थवाही, मनाला जाऊन भिडणारी आहे. तिच्यावर ग्रामीणतेचा व स्त्रीत्वाचाहि अेक ठसा उमटलेला आहे त्यामुळे ती वेगळी व आकर्षक वाटते.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लेखिकेची स्त्रीसमाज सुधारणेची तळमळ, ग्रामीण व अशिक्षित स्त्रियांच्या विषयी तिला वाटणारी आत्मीयता, सहानुभूति व क्वचित् अभिमानहि प्रशंसनीय आहे. कांही ठिकाणी उपदेशाचं ओझं अनावर वाटतं व क्वचित कांही वेळा आत्मप्रशंसा स्पष्ट होते, आत्म प्रचाराची झाकहि मारते. या गोष्टी टाळल्या तर साध्या सुंदर शैलीने नटलेले हे सोज्वळ उपदेशवर गद्य अधिक आकर्षक व हितावह ठरल्याशिवाय राहणार नाही.

—श्री. मा. कुलकर्णी

वामन व ध्वनि (पृष्ठ ९ वरून)

नंतर वैदर्भीचे म्हणून जे उदाहरण दिले ते शाकुंतलातील पद्य पहा.

"गाहन्तां महिषा निपानसलिलं शृंगैर्मुहुस्ताडितं
छायावद्धकदम्वकं मृगकुलं रोमन्थमभ्यस्यतु ।
विश्रव्धं क्रियतां वराहततिभिर्मुस्ताक्षतिः पल्वले
विश्रामं लभतामिदंच शिथिलज्यावन्धमस्मद्धनुः ॥

ह्यात ध्वनि आहे. वाच्यवर्णन महत्वाचे नाही. प्राधान्य, सूचित अर्थाचे आहे. त्यातून राजाच्या मनात प्रादूर्भूत झालेला रत्याख्य भाव व्यंजित झाला आहे. भावोदयाचे हे सुंदर उदाहरण आहे. वाच्यवाचकव्यतिरिक्त पण त्यांतूनच व्यंजित झालेल्या ध्वन्यर्थामुळे—त्या तत्वामुळे ह्या वैदर्भीतून हा वाङ्.मधु स्रवतो. हा श्लोक अधिक हृद्य वाटतो.

म्हणून वामनाच्या मते—

(१) रीति काव्याचा आत्मा. रीति तीन.

(२) पण आत्मा म्हणून—एकच व ती म्हणजे वैदर्भी.हिच्यात—

(३) रेखासु चित्रमिव—आत्मा प्रतिष्ठितम्—हा आत्मा म्हणजे 'ते' तत्व.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'तुकाराम महाराजांची गुरू-परंपरा'

ले०-वा. सी. बेन्द्रे, प्रकाशक : मौज प्रकाशन गृह, मुंबई ४, किंमत ८ रु.

श्री. बेन्द्रयांनी सर्वात अधिक कमाल केली आहे 'चैतन्य' या शब्दाच्या उपपत्ति बाबत आणि ती पाहिली, की त्यांच्या हेतूबद्दल नको नको त्या कल्पना मनात येतात. 'चैतन्य' हे पंथनाम नसून, श्रेष्ठावस्था दर्शविणारे संन्यासाश्रमीचे नाव आहे, हे श्री. बेन्द्रे स्वतःच मानतात. चैतन्य म्हणविणारे पूर्वी पुष्कळ होऊन गेले हे त्यांनीच दाखविले आहे. लक्षात ठेवण्याजोगे हे, की त्यात एकहि महानुभावीय नाही. श्री ज्ञानेश्वरांच्या वडिलांचे संन्यासाश्रमी नांव चैतन्यच होते. महानुभावीय संन्याशात 'चैतन्य' नसतो. या गोष्टीची कल्पना आल्यामुळे की काय, आपले प्रतिपादन निरर्गल न ठरण्याकरिता; श्री. बेन्द्रे यांनी महानुभावाच्या भिन्नसंदर्भ असलेल्या चैतन्य या शब्दाचा आश्रय घेतला. त्यांनी 'चैतन्य शाखेचे तत्त्वज्ञान असे' (पृ. ६४) असे म्हणून जे प्रतिपादन केले आहे, ते वाचकांच्या डोळयात धुळ फेकणारे आहे असेच म्हणावे लागते. माझा अभिप्राय कटु व कडक आहे, हे खरे. पण श्री. बेन्द्रयांना शोभू नये ते त्यांनी केले आहे. त्यांनी आपल्या या मुद्याच्या समर्थनार्थ डॉ. कोलत्यांच्या 'महानुभावीय तत्त्वज्ञान' या ग्रंथाची तरफदारी करून हवाला दिला आहे. त्या ग्रंथाच्या अभ्यासकांस हे ठाऊक आहे, की महानुभावात तत्त्वज्ञानाची चैतन्यशाखा म्हणून कांही नाही. चैतन्य हे मायेचे पर्यायनाम आहे. महानुभावात देवतांचे नऊ थोवे आहेत. विश्व या आठव्या थोव्याचा उल्लेख मी मागे केलाच आहे. त्यानंतरची नववी देवता माया. तिलाच चैतन्य, विदेह, परा, शक्ति अशी पर्यायनामे आहेत. ही सर्वात 'ऊच देवता' खरी. (यानंतर ब्रह्म व पुढे परमेश्वर अशी महानुभावीय तात्त्विक बैठक आहे.) पण ती इतर देवतांच्या गुणधर्माचीच आहे. ती परमेश्वराची 'अवर' शक्ति आहे. तिलाच 'अपरा' किंवा 'अवर' विद्या असेहि म्हणतात. 'चैतन्यविद्या आदि करोनि सकळहि विद्या अपरा' असे विचार-मालिकेत म्हटले आहे. हिचे फळ संतासंत मिश्रित असते; तिथे 'अंतिका'चें दुःख असते (कोणत्याहि कर्मफळातून बाहेर पडतांना होणारे दुःख 'अंतिक' होय), 'चैतन्य प्राप्ती जीवु भ्रांत होउनि असे' या म्हणण्याप्रमाणे चैतन्य फळिया पूर्ण-पणे भ्रांत होऊन सुख उपभोगितो. चैतन्यफळ च्युतिमंत असते, अनित्य असते, ते मोक्ष देत नाही. उलट ते विघ्नरूप आहे. यावरून चैतन्यविद्या व चैतन्य-विद्यावंत यांचे महानुभावीय विचारसरणीतील स्थान अभ्यासकांच्या लक्षात यईल. आतां चैतन्यत्रयीकडे या महानुभावी दृष्टिकोनातून पाहिले तर प्रश्न

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असा पडतो, की श्री. वेंद्रे तिची स्तुति करतात, की बदनामी करतात ? सर्वश्रेष्ठ सिद्ध म्हणून चैतन्याची ते वाहवा करतात आणि त्याच वेळी त्यांचा 'चैतन्य'पणा महानुभावीय ठरवितात ! इतिहास संशोधक निरकुंश असतो तो असा ! !

राघवचैतन्यांचा व्यास 'सत्यवती हृदयनंदन' आहे, हे कृष्णदासाने स्पष्ट म्हटले आहे. ते उपदेशानंतर 'बद्रीनारायणा जाऊन । तपश्चर्येसी बैसले ॥' असेहि तो सांगतो. याचा स्पष्टार्थ हा आहे, की श्री. वेन्द्रे भासवितात त्याप्रमाणे महानुभावीय व्यासांचा राघव चैतन्यांच्या संन्यास दीक्षेशी मुळीच संबंध नाही. पुराणादि सांगणारा व्यास इथे संभवत नाही. या प्रतिपादनात श्री. वेंद्र्यांनी पराधर्मातील घटनांचे अज्ञानच दाखविले. ओतूरच्या तपोवनात व्यास राहिले असोत अथवा नसोत अथवा त्यांनी पूर्वी कोणास तसा उपदेश दिलेला असो अथवा नसो, राघव चैतन्यांच्या उपदेशाच्या आड या गोष्टी कशा येतात ? मी पूर्वी म्हटलेच आहे, की पराधर्मातील स्थल–कालाची मोजमापे वेगळी असतात. श्री. तुकारामांनी आपल्या एका अभंगात (ब्रम्हज्ञान जरी एके दिवशी कळे. . . . . . . अभिमान ॥ इ.) असे म्हटले आहे की शुकाच्या पाठी अभिमान लागला तेव्हा व्यासांनी त्याची दृष्टि उफराटी केली; जनकाच्या भेटीस त्याला त्यांनी पाठविले; जनकाने त्याचे अभिमानताचे खोटे केले, तसे केल्यावर त्याला अभ्यासास लावले; शुक मेरु पठारास गेला; तिथे जाऊन त्याने समाधि लाविली तेव्हा आम्ही तिथे होतो. (जाऊनिया तेथे लाविली समाधी । तुका म्हणे तधीं होतो आम्ही ॥) हे जर शक्य, तर व्यासोपदेश शक्य कां नाही ? पुन: श्री दत्तात्रेयांनीच व्यासोपदेशाची योजना केली होती हे 'चैतन्य-लीले'वरूनच स्पष्ट दिसते यावरून श्री. वेंद्रे यांची राघव चैतन्यांना सशास्त्र दीक्षा मिळाली नाही ही कल्पना वायफळ ठरते. केशव चैतन्यांना शास्त्र पाहून, विश्व नियमास धरून, मास नामानुसार नामकरण करून दीक्षा देणारे राघव चैतन्य अशास्त्र विहित सन्यासधर्मी म्हणून मिरविशील हे श्री. वेंद्रेच खरे समजोत ! कृष्णदासाच्या आधाराने श्री. वेंद्रेच सांगतात, की व्यासांनी राघव चैतन्यांचे समाधान केल्यावर 'त्याचे परंपरेचे नांव' ठेविले. (पृ. ६२) याचा अर्थ त्यांचा संन्यास विधिपूर्वकच होता. राघव चैतन्यांना क्षात्र कुळाचे ठरविण्यात देखील श्री. वेन्द्रे यांनी सहेतुकताच उघड केली आहे. त्यांना नूतन मार्ग, क्रांति, धर्म–पंथ–जाति–वेष इ. ची अतीतता इ. कल्पनांनी पछाडलेले असल्यामुळे त्यांनी आपल्या सर्व संशोधनाचे धागेदोरे तदनुसार गोळा केले आहेत, गुंफले आहेत. 'शौर्यकुळी' या एका शब्दावरून त्यांनी तो तर्क केला. कृष्णदासाचा उपलब्ध ग्रंथ ओवीरचना इ. बाबतीत बांधेसूद नाही. त्यात

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अर्वाचीनीकरणाबरोबरच नकलकाराची स्खलनेहि आहेत. त्यामुळे 'शौर्यकुळी' या शब्दावरून क्षत्रियकुळ ठरविणे धोक्याचे आहे. पुढचीच ओवी अशी आहे; उत्तरीची राष्ट्रें जीं थोर । जे कां असती धीर वीर । त्यांही सोडोनि जोर । शरण येती तया ।।' यावरून 'शौर्यकुळी' या शब्दाचा अर्थ कां लावू नये? एकतर क्षत्रियांना योगानुष्ठानाचा अधिकार असूनहि संन्यासाचा अधिकार नाही. तेव्हा 'सत्यवती हृदयनंदन' व्यासांनी, ते क्षत्रिय असते, तर संन्यासदीक्षाच दिली नसती. तसेच शास्त्राची चाड असणाऱ्या राघव चैतन्यांनी ब्राम्हण असलेल्या केशव चैतन्यासहि संन्यास दीक्षा दिली नसती. दुसरे असे, की कृष्णदासच राघव चैतन्यांचे वर्णन करितो, की "गिरिनार पर्वताताळीं । वसत होते शौर्यकुळी । यवन अनार्थाचेवेळीं । गुरु माझे ।। रंगनाथ तयाचे नाम । घोर वनी तयाचे धाम । असोनि पंडिताचें काम । साधित होते ।।" श्री. वेंद्रे लिहितात, "त्याचे वडील यवनांचे सेवेंत राहिले. त्यांचा पंडिताचा किंवा देशलेखकाचा परंपरागत व्यवसाय होता." (पृ ६१–६२) श्री. वेंद्रे यांनी आपले इतिहासाचे ज्ञान कसास लावून हें सरळ सांगावे, कीं कोणत्या क्षत्रिय कुळाने त्याकाळी परंपरागत् हा व्यवसाय केला होता? ब्राम्हणकुळे त्यावेळी हा व्यवसाय करीत असत हें सर्वज्ञात आहे. श्री. वेंद्रयांच्या पोटात क्रांति, शृंखला, नवधर्म इ. चा गर्भ असल्यामुळे त्यांनी राघव चैतन्यांना क्षत्रिय ठरविले हे उघड उघड दिसते. तदनुसार त्यांनी महानुभावीय आचाराचा प्रवेश केला म्हणूनच ते असे लिहू शकतात, की 'त्यानंतर दत्ताने दर्शन देऊन शांभवी शक्तीच्या साहाय्याने चैतन्यमार्ग स्वीकारण्यास आज्ञा केली.' (पृ. ८७) लक्षात ठेवण्याजोगे हे, की ग्रंथकार कृष्णदास असले कांहीच सांगत नाही; संशोधनाचे ते डोहाळे होत!

श्री. वेंद्रे यांच्या ऐतिहासिक बुद्धीच्या कोल्हाटिणीचा सर्वांत आश्चर्यकारक खेळ पहाण्याजोगा आहे. आपला महानुभावीय प्रक्षेप जमण्यासारखा नाही याची टोचणी त्यांना असावी. पण त्यांना तो हवा तर आहे टोचणी व इच्छा यांच्या संघर्षांत त्यांनी असा मार्ग काढला, की "राघव चैतन्यांनी जरी सुरुवातीस आपल्या पराप्राप्तीसाठी नागदेव भट्टाच्या धर्माची कास धरली असली आणि नंतर पराप्राप्तीसाठी त्या पंथाच्या तत्त्वांचे व आचारांचे अनुकरण केल्याने ओतूरच्या ग्रामस्थ मंडळींनी त्यांची, त्यांचे शिष्य केशव चैतन्य यांची व त्यांच्या मठाची महानुभावियात गणना केली असली तरी त्यांनी त्या पंथाची प्रत्यक्ष, दीक्षा घेतली होती असे समजण्यास पुरावा नाही. एक तर 'चेतन विद्ये'स तशा पंथीय गुरुकडून दीक्षा घेण्याची जरूर नव्हती. शिवाय राघव चैतन्यांनी खास आश्रम किंवा मठिका चालविली नसल्याने त्या पंथियात त्यात सामील होण्याची आवश्यकता नव्हती. उलट त्यांनी त्वरित केलेल्या तयारीने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व घेतलेल्या अनुभवाने त्यांचा दृष्टिकोनच बदललेला दिसतो. त्यांची दृष्टि महानुभावी पंथाप्रमाणे नुसती वर्णातीतच नव्हती तर वर्ण–जाति–धर्म भेदातीत झाली होती. त्यांच्या शिष्यपरंपरेकडे पाहिले तर त्यांनी वेष आणि विशिष्ट आचार यांचे बंधनहि झुगारलेले दिसते. सारांश, या चैतन्यद्वयीच्या बाबतीत जरी थोडासा सुरुवातीचा 'मल' चिकटून राहिला असला तरी नंतर त्यांची त्या पंथीय आचार विचारांशी फारकतच झालेली दिसते. इतकेच नव्हे, तर शोध घेऊनहि या चैतन्यत्रयीची महानुभावीय पंथात दीक्षा झाल्याची नोंद कोठेच आढळलेली नाही. राघव चैतन्यांनी कोणापासूनही ज्ञान प्राप्त करून घेतले असले तरी आपला आपणच उद्धार करून घेतला असल्याने ही परंपरा स्वतंत्रच मानणे जरूर आहे." (पृ. ७२–७३) परंपरेचे संपूर्ण ज्ञान असलेल्या व त्यात मुरलेल्या कृष्णदासाने सांगितलेल्या इतिहासानुसारः–

(१) राघव चैतन्यांची परंपरा व सशास्त्र दीक्षा वैदिकच होती.

(२) महानुभावीय आचार–विचाराचा त्यांच्याशी लव मात्र संबंध नव्हता.

(३) त्यांना आज्ञा झाल्याप्रमाणे जगदुद्धाराकरिता त्यांनी संप्रदाय स्थापन केला व वाढविला. 'सांगितली खूण माळिकेची' हें शंभर टक्के सत्य आहे.

(४) वैदिकमार्गी असून व त्याबाबत त्यांची सशास्त्र अढळ धारणा असून, अलिकडे होऊन गेलेल्या हुमणाबादच्या माणिकप्रभूंप्रमाणे अथवा त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या श्री नरसिंह सरस्वतीप्रमाणे राघव चैतन्यांनी यवनयुगात सर्वांना ज्याचे त्यापरी मार्गास लाविले.

या सर्व गोष्टी निर्विवाद दिसतात. श्री वेंद्रे यांनाहि त्या अमान्य करवत नाहीत. त्यामुळेच त्यांना कोलाट उड्या खाव्या लागत आहेत. वर कबूल केल्याप्रमाणे त्यांना जर कोणताच सरळ व सबळ पुरावा आढळत नाही, तर श्री. वेन्द्रे साहेब ! आढेवेढे न घेता सरळ सरळ लिहून टाकाना एकदा, की श्री तुकाराम महाराजांच्या गुरुपरंपरेच्या बाबतीत माझ्या संशोधन वुद्धीने अनन्वितपणा केला आहे ! श्री. वेन्द्रे यांनी स्वतःच्या प्रतिपादनातील सारे चैतन्य या पूर्वोक्त उद्‌गारांनी नष्ट केले आहे !!

राघव चैतन्यांच्या बाबतीत प्रत्यक्षाप्रत्यक्ष पुरावा कोणताच नाही. हे श्री. वेन्द्रे यांच्या पृ. ७२–७३ वरील उताऱ्यावरूनच उघड होते, हे मी मागे दाखविलेच आहे. त्यांचा सर्वाधिक भर दिसतो, तत्कालीन कागद पत्रात केशव चैतन्यांच्या नांवापुढे 'महानुभाव' हा शब्द आला आहे, त्यावर. राघव चैतन्यांनी महानुभावीय दीक्षा घेतली नाही, ते महानुभावात सामील झाले नाहीत हे कबूल करणारे श्री. वेन्द्रे म्हणतात, की केशव चैतन्यांची व त्यांच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मठाची महानुभावीयात ओतूरच्या ग्रामस्थ मंडळींनी गणना केली. याचा पुरावा म्हणजे 'महानुभाव' शब्दाचा त्याकाळी केला गेलेला उपयोग. श्री वेन्द्रेयांचा हाहि पाया कसा भुसभुशीत आहे ते पहा. एक तर महानुभावीय लोक राघव चैतन्य यांना आपले म्हणवीत नव्हते. दुसरे असे, की महानुभाव या शब्दाने महानुभावपंथी असा अर्थ त्यांच्या बावतीत संभवत नाही. याची कारणे अगदी स्पष्ट आहेत. श्री. वेन्द्रे यांनी स्वतःच उल्लेखिलेल्या पुराव्यात एका ठिकाणी 'वेदमूर्ति श्री केशव चैतन्य महानुभाव स्वामी' असे म्हटले आहे. महानुभाव संन्याशास 'संन्याशी' म्हणत होते किंवा नाही हा प्रश्न जरी सोडला, तरी श्री. वेन्द्रे यांना असे खडसून विचारावेसे वाटते, की 'वेदमूर्ति' हे विशेषण वैदिकेतरांना कधी तरी लावण्यात येत असे काय ? तत्कालीन कागद पत्रात केशव चैतन्यांच्या नांवापुढे 'महानुभाव' हाच शब्द केवळ येत नाही. 'संन्याशी', 'स्वामी', 'महापुरुष', 'देव' इ. शब्द आले आहेतच. यावरूनच 'महानुभाव' शब्दाच्या अर्थप्रयोजनाची दिशा स्पष्ट होते. साधारणतः मनुष्यस्वभाव असा आहे, की एखादे विशेषण एखाद्या व्यक्तीस प्रसंगानुसार एकदा लागले, की तेच वारंवार आवृत्त होते. श्री. वेन्द्रे यांनी दिलेल्या यादवबावाचे व कृष्णदासाचेच उदाहरण पहा. यादव बावास स्वामी वा गोसावी म्हणण्याचा प्रघात एकदा पडला, त्यामुळे त्यांचा उल्लेख पुष्कदा तसाच येतो. कृष्णदास वैरागी वा महंत या नांवाने तसाच वारंवार उल्लेखिला जातो. केशव चैतन्यांच्या बावतींत 'महानुभाव' या शब्दाच्या दृष्टीने असेच घडलेले दिसते. कोणत्या तरी निमित्ताने एकदा त्यांना 'महानुभाव' म्हटले गेले व तेच विशेषण पुढे पुनः पुनः लावले गेले. श्री. वेंद्रे लिहितात, की हे "बहुमानार्थी विशेषण नेहमी नांवापूर्वी लावण्याचा प्रघात आहे. परंतु तो शब्द जर वर्णनात्मक किंवा व्यवसाय सूचक असेल तर तो शब्दप्रयोग पूरक असा असल्याने नावानंतर येतो. वरील सर्व उल्लेखांवरून त्या मठाला 'महानुभावीय' मानले जात होते यात शंका नाहीं." (पृ. ६५) श्री. वेंद्रे सोयीवार समजुती करून घेण्यात कुशल दिसतात ! त्याकाळी ते म्हणतात तसा प्रघात दिसत नाही. कृष्णदास व केवलराम बाबा यांना 'महंत' हे बहुमानार्थी विशेषण नांवानंतरच लावलेले आहे. स्वामी, गोसावी इ. शब्दांचेहि तसेच आहे. बहुमानार्थी हे शब्द मागाहून आले आहेत. तसेच 'महानुभाव' शब्दाचे. केशव चैतन्यांच्या समाधीची सेवा करावयास आलेल्या कृष्णदास, यादवबावा, शिवराम स्वामी इ. मातब्बर साधकांनी केशव चैतन्यांना महानुभावपंथीय म्हणून कधीच संबोधले नाही; ते त्यांना शुद्ध वैदिक पद्धतीचेच समजत. मग त्यांनी असा कट केला होता काय अथवा अशी शपथ वाहिली होती काय की केशव चैतन्यांचे महानुभावत्व उघडकीस येऊ नये ?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'महानुभाव' शब्दाने श्री. वेंद्रे फसले. त्यांना वाटले आपल्या कल्पनेस हा शब्दप्रयोग पुष्टिद आहे. पण त्याकाळी अथवा त्यापूर्वीहि हा शब्द पंथीय अर्थानेच व तोहि विशेष नामानंतरच वापरला जात होता काय, याची त्यांनी नीट तपासणी केली नाही. 'महाराष्ट्र सारस्वत' कारांनी नमूद केलेले उदाहरण इये उल्लेखण्या जोगे आहे. ते म्हणतात "जनीजनार्दनाचा एक वंशवृक्ष मी पाहिला आहे. त्यावर श्रीवंश परपरा श्रीजनीजनार्दन महाराज सिद्धपुरुष महानुभाव कुळपुरुष' असे लिहिले आहे." यानंतरचे वाक्य 'यांतील 'महानुभाव' हा शब्द चिंतनीय आहे'. (आ. ४ थी पृ. २९५) असे आहे. जनीजनार्दन हे 'नाथ–पंचकां'तील एक होत. त्यांनाहि वहुमानार्थी 'महानुभाव शब्द लावला आहे. अर्थात् ते पंथीय नव्हते हे श्री वेंद्रेहि कवूल करतील. 'सारस्वत'कारांचे पुढील वाक्य त्यांच्या काळास धरून वरोवर होते.. पुढच्या संशोधनाने ही चिंतनीयता नाहीशी झाली आहे. पहिली लक्षात ठेवण्या जोगी गोष्ट ही आहे, की 'महानुभाव- हा शब्द पेशवाईच्या काळापर्यंत पंथीयतेपेक्षा 'महापुरुष' या वहुमानार्थींच जास्त वापरला गेला आहे. पंथीयांनी हा शब्द वैदिकापासून उसना घेतलेलाच दिसतो, स्वतःची घसरत असलेली प्रतिष्ठा राखण्याकरिता याला आधार देता येतात. खुद्द महानुभाव पंथीयांनी 'महानुभाव' हा शब्द योगिक अर्थानेच कसा वापरला आहे, हे डॉ. तुळपुळे यांनी 'सारस्वता'च्या आपल्या 'पुरवणीत' उत्तम दाखविले आहे. महानुभाव पंथाचे मूळ नांव वेगळे आहे, हे डॉ. कोलत्यांनीहि दाखविले आहेच. (लोक शिक्षण मासिक वर्ष ७, अंक ४–५) डॉ. तुळपुळ्यांचे प्रतिपादन विचारणीय असल्यामुळे मी ते उद्धृत करीत आहे. ते म्हणतात, "ज्ञानेश्वरां-पासून मध्वमुनीश्वरांपर्यंत सर्व कवि या शब्दाचा 'महान् अनुभवी' हा परमार्थच घेऊन चालतात. एक निरंजन माधव मात्र 'शैववैश्णव शांभव । सौर गाणपत्य शाक्त महानुभाव' या चरणात (संप्रदाय परिमळ, उद्गार ५–११८) महा-नुभाव शब्दाचा पंथविशिष्ट उल्लेख करितो. पण याच कवीने हा शब्द अन्यत्र सामान्य अर्थाने वापरला आहे. याचा अर्थ असा, की 'महानुभाव' या शब्दाचा अभिप्राय १७ व्या शतकापर्यंत तरी पंथविशिष्ट नव्हता. स्वतः महानुभाव कवींनीहि प्रस्तुत शब्दाचा वापर यौगिकार्थानेच प्रथमपासून केलेला आहे... ....तेव्हां 'महानुभाव' पंथ हे नांव श्रीचक्रधर किंवा नागदेवाचार्य यांना अभिप्रेत नव्हते एवढे निश्चित. चक्रधराच्या संप्रदायातील सर्वजण 'महानुभाव' होते हे खरे; परंतु 'महानुभाव' म्हणजे चक्रधरपंथीय असे मात्र नव्हे. अर्थात् पंथाला हे नांव अलिकडे मिळाले असावे.......... तात्पर्य, हा संप्रदाय एकनाथांच्या काळापासून 'मानभाव पंथ' या नावाने महाराष्ट्रास ओळखीचा आहे." (पृ. ८५६) सिद्ध, संत, साधु, मुनि इ. चा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पर्यायवाचक शब्द म्हणून श्रीगुरुचरित्र, श्रीतुकारामांची गाथा, श्रीमद्दासबोध इ. ग्रंथात हा शब्द आलेला सर्वांना ठाऊकच आहे. श्रीनाथांनी मानभावपंथीयांची निंदा केली त्यावरूनहि माझा मुद्दा स्पष्ट होतो. ते म्हणतात,

"होउनी मानभाव । अवघा बुडविला ठाव ।।
जालों म्हणती मानभाव । अंतरीं शुद्ध नाही भाव ।।
मानभाववाई । आम्हा भिक्षा वाढा कांहीं ।।

अथवा

"होउनी मानभाव । अवघा वुडविला ठाव ।।
नाहीं चित्त शुद्धगती । द्वेष देवाचा करिती ।।
धरिती उफराटी काठी । रांडा पोरें भोंदी वाटी ।।
नेसोनियां काळेपण । अगा लाविती दूपण ।।
एका जनार्दनी देवा । जळोजळो त्यांची सेवा ।।"

'महानुभाव' म्हणवितो पण अंतर शुद्ध नाही' या दूषणाचाच अर्थ असा, कीं अंतर शुद्ध असलेल्यास पूर्वी 'महानुभाव' हा शब्द लावीत असत तोच शब्द आत्मप्रतिष्ठा वाढविण्यास चक्रधरपंथीयांनी उचलला व स्वतःची घसरत असलेली पत सावरण्याचा प्रयत्न केला. श्री. वेंद्रयांचीच साक्ष इथे उपयोगी पडण्यासारखी आहे. राघवचैतन्य 'सापे नागदेव भट्ट नावे मार्ग एकूं उदेला असे' असे म्यणतात, 'महानुभाव पंथ' हा अथवा असाच दुसरा कोणता शब्द ते वापरीत नाहीत. याचाच अर्थ असा, की त्यांच्या वेळी 'महानुभाव' शब्द पंथीय या अर्थाने रूढ झाला नसावा.

दुसरीहि एक ठळक गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे, ती श्रीनाथांच्याच अभंगांवरून स्पष्ट होते. पंथीय या अर्थाने 'महानुभाव शब्द त्याकाळी टाकाऊ व तिरस्कार्य ठरला होता. अंतःकरण शुद्ध नसणे, देवाचा द्वेष करणे, लोक विलक्षण चिन्हे वारण करणे, रांडा पोरांना भोंदविणे इ. गोष्टीवद्दल कुप्रसिद्ध झालेल्या पंथाच्या अर्थाने 'महानुभाव' शब्द केशव चैतन्यांच्या नांवापुढे लावला गेला असे समजणें हीनपणाचे आहे. श्रीनाथासारखा सर्वहितरत व क्षमाधीर महापुरुपहि त्या पंथास विटला होता व 'आमच्यावर मेहेरवानी करा' असे म्हणून भिक्षा मागू लागला होता. असे होण्याच्या पाठीशी कांही इतिहास आहे. श्री. वेंन्द्रयांनीहि, थोडया वेगळ्या प्रकाराने ही कवूली दिलीच आहे, की राघव चैतन्य व केशव चैतन्य यांच्याकाळी महानुभाव पंथास उतरती कळा लागली होती.

श्री. वेन्द्रे यांच्या संशोधनास द्यावयाचेच झाले तर खोडसाळ हेच विशेषण देता येईल, असे खेदाने म्हणावे लागते ! चैतन्यत्रयी महानु-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भावीय आहे असा वाचकावर ठसा उमटावा अशी मांडणी सर्व ग्रंथभर त्यानी केलेली आहे. पण कोणी कंठास बसून "वळकट पुराव: दे" असे खडसावू लागला तर त्यांनी अनेक तर्क करून स्वत: निसटून जाण्याची तरतूदहि करून ठेवली आहे. प्रारंभी ते महानुभावीय होते पण पुढे त्यांच्या दृष्टिकोनात बदल झाला, ते त्यात सामिल झाले नव्हते व प्रत्यक्ष दीक्षा घेतली नव्हती. इ. युक्तिवाद ते पुढे करतात. जर या गोष्टी खऱ्या, तर त्यांना आमरण तसेच चित्रित करण्यात श्री. बेन्दे यांनी कोणत्या ऐतिहासिक सत्याची चाड बाळगली आहे ? केशव चैतन्य महानुभाव असे त्याच्या हयातीतच नव्हे तर त्यानंतर अनेक शतके देखील म्हटले गेले यावरून काय समजावयाचे ? त्यांच्या दृष्टिकोनात बदल झाला असेंच का ? श्री. बेन्द्रे यांनी ज्या कागदपत्रांचा सविस्तर उल्लेख केला आहे त्यातील कांही कांही ठळक गोष्टी अभ्यासकांनी फार लक्षात घेण्यासारख्या आहेत. सन १५६६ मध्ये केशव चैतन्याच्या मठास त्यांच्या हयातीत निजामशाहीतून प्रथमत: इनाम मिळाले ते त्याच्या मुलांच्या नांवाने होते. श्री. बेन्द्रांच्या मते केशव चैतन्य स १५७१ मध्ये समाधिस्थ झाले. त्यानंतर नवीन केल्या गेलेल्या खुर्दखतात त्यांचा एक मुलगा व एक नातू यांच्या नांवावर ते इनाम केले गेले आहे; आणि तेहि "विद्यार्थी मठीं सेवा करतात म्हणून". त्यावेळीं केशव चैतन्यांच्या नांवानें व वंशपरंपरागत असा इनाम नसण्याचे कारण त्यांचा संन्यास वैदिक पद्धतीचा होता हेच आहे. संन्यासाश्रमात नातलगाचा संबंध उरत नाही. म्हणूनच 'विद्यार्थी' हा शद्ब आला आहे व तो महत्वाचा आहे. पुढे हा इनाम वंशपरंपरागत झाला. इनामाचा उल्लेख पुढे एकदम ८०–८५ वर्षानंतर राजाराम छत्रपतींच्या कारकीर्दीत येतो. त्यानंतर मराठेशाहीत तो चालू झालेला दिसतो. आता या सर्व कागदपत्रात 'महानुभाव' हा शद्ब आला आहे हे खरे पण त्याचा बारकाईने विचार श्री. बेन्द्रे यांनी केला नाही. कागदपत्रांत केशव चैतन्यांचा मूळ उल्लेख निजामशाहीतला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्या उल्लेखा-बरोबरच 'ब्राह्मण व हिंदू' यांचाहि त्याच इनामात उल्लेख येतो. सारस्वतकार भावे यांचा एक अभिप्राय या संदर्भात विचारात घेण्याजोगा आहे. ते म्हणतात, '·······या महानुभावांना ज्या सनदा मुसलमानाकडून मिळाल्या आहेत, त्या सनदात हे हिंदूपेक्षा निराळे आहेत, असा स्पष्ट ध्वनि आहे; व तो त्याकाली मान्य केला गेला आहे.' (पृ. ८१) तेव्हां केशव चैतन्य महानुभाव असते तर त्यांच्या मठाच्या इनाम पत्रात ब्राह्मण व ब्राह्मणेतर या अर्थी हिंदु हे शद्ब येणेच अशक्य.

मराठेशाहीत केशव चैतन्यांना महानुभाव म्हटले ते पूर्वापार चालत आलेल्या कायदेशीर वहिवाटीने. मराठेशाहीने त्यांना महानुभाव पंथीय म्हणून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इनाम दिले नव्हते ही गोष्ट कागदपत्रच स्पष्ट करतात. राजारामाची सनद असंदिग्ध आहे. त्यात राजर्षि घराण्याचे गोत्र व सूत्र देऊन केशव चैतन्याच्या शिष्याचा उल्लेख आहे. वृत्तिपत्राची ही सनद इनाम पुनः चालू करणाऱ्याचे शद्व असे नमूद करिते 'त्यास ह्या देश निजामशाहापासून ताम्रानी आक्रमिला. तेही कित्येक दिवस वृत्ति चालविली. त्या उपरी अवांतराकरितां आपण देशांतरास गेलो. याकरितां वृत्तीचे सवरक्षणास नाही. यास्तव हे वृत्ति ताम्रानि अमानत केली आहे. यैसियास महाराज धर्मपरायण कितेक देवब्राह्मणाचा जीर्णोद्धार करून स्थापना केली. मठ वहुत थोर. वहुत संत पुरुपाचा आहे. त्याची पुज्या पुरस्कार व आपले कुटुंवाचा योगक्षेम चालला पाहिजे यास्तव वृत्ति उदेश स्वामीपासीं आलो आहे. तरी सदरहू पुरातन वृत्तीचा जीर्णोद्धार करून देविल्यास स्वामीचे आज्ञेकडून श्री स्वामीचे मठाची पुज्या पुरस्कार करून कुटुंवास वर्तमान आन भक्षून सतकर्मे आचरून कल्याणाभिवृद्धि चिंतून सुखरूप असो म्हणोन श्रुत केले त्यावरून मनास आणिता श्रीकेशवस्वामीचा मठ वहुत थोर पुरातन. ······" यावरून हे स्पष्ट दिसत नाही काय, की केशव चैतन्याचे वंशज व राज्यकर्ते त्यांना वैदिक धर्मीच समजत असत ? इथे "महानुभाव" शद्व संत याअर्थीच नाही काय ? "वहुत संत पुरुषाचा" हे शद्व "महानुभाव" या शद्वाचे स्पष्टीकरणच नव्हे काय ? इतर कागदपत्रात वेदमर्ति इ. विशेषणेंहि चैतन्याच्या वंशजास दिलेली आहेत. राजर्षि घराण्याची कुलदेवत नरसिंव्ह. तिची जयंति मठात साजरी होत असे, या व इतरहि कित्येक गोष्टीवरून सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट होते की केशव चैतन्याला महानुभाव पंथीय कोणीच समजत नव्हते.

(अपूर्ण)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साभार पोच

इंद्रायणी–दिवाळी अंक १९६२ संपादकः **रा. चिं. ढेरे**, प्रकाशक **दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर** १२५७ सदाशिवपेठ, पुणे २. मूल्य दीड रूपया.

दिवाळीच्या शुभमुहुर्तावर 'इंद्रायणी' हे 'अध्यात्मिक भूक भागविणारे' नवे मासिक सुरू झाले असून त्याचा हा पहिला अंक 'दिवाळी अंक' म्हणून प्रसिद्ध झाला आहे. 'मानवी मनाला शुद्ध अध्यात्माची भूक सदैव असते. . . .आपल्या संतांच्या चरित्रात आणि वाणीत ही भूक भागविण्याची अपार शक्ति आहे. हे लक्षात घेऊनच आम्ही संत–चरित्रे आणि संतवाणी यांचा संदेश सर्व सावारण जिज्ञासू जनांनयंत पोचविण्यासाठी हे मासिक प्रकाशन सुरू करीत आहो' असे संपादक म्हणतात तथापि त्यांच्याच म्हणण्या प्रमाणे 'इंद्रायणी'चा प्रवाह एवढ्यापुरताच मर्यादित राहणार नाही. तर 'संत-प्रेरणांच्या बैठकीवर इतिहास, संस्कृति, विज्ञान, कला, शिक्षण आणि समाजजीवनाची अन्य अंगोपांगें यांचाहि साक्षेपाने परामर्ष' घेतला जाणार आहे. उपक्रम स्तुत्य आहे, स्वागतार्ह आहे. ध्येय भव्य आहे, उदात्त आहे.

या पहिल्या अंकात, **ज्ञानेश्वरीतील शुभचिंतन**–काकासाहेब कारखानीस **गोस्वामी तुलसीदास**–पु. पां. खोखले, **नाथांची एक 'ज्ञानकथा'**–प्रा. भा. श्री. परांजपे, **यदु–अवधूत–संवाद**–ग. वि. तुळतुळे, **नेपाळांत तुळजाभवानी**–रा. चिं. ढेरे, **अनुभवामृताचे भाष्यकार**–वा. दा. गोखले, भा. पं. बहिरट इ. महत्वाचे लेख व विद्वान लेखक एकत्र आलेले आहेत.

या ऐका अंकावरून या मासिकाच्या स्वरूपाची संपूर्ण कल्पना येणे शक्य नाही. कार्याचे मूल्यमापन तर करणे रास्त होणारच नाही. आम्ही या अभिनव उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत करतो व 'इंद्रायणी'चा हा प्रवाह अखंड प्रवाहित राहून ध्येय समुद्राला मिळत राहो अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

–श्री. मा. कुलकर्णी

चुकीची दुरूस्ती

'युगवाणी' दिवाळी अंकात (१९६२) पं. वेनीराम दुवे हा महाराष्ट्रीय होता काय ? हा श्री. दे. गो. लांडगे यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात पान ८३ वर पं. वेनीरामच्या वडिलाचे नांव 'विश्वंभर' होते असे चुकीने छापले गेले आहे. **'पं. वेनीरामच्या वडिलाचे नाव 'शिवभद्र' होते'** असे श्री. लांडगे कळवितात.

–संपादक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी'च्या संबंधात–

वाचकांचा पत्रव्यवहार

'युगवाणी'च्या जुलै अंकातील शाहिरी वाङमयावरील आपला परिसंवाद मला फार आवडला. 'युगवाणी'चें तें एक वैशिष्टयपूर्ण असें आकर्षण झालें आहे'.

२३–७–१९६२ (प्रा.) म. ना. अदवंत, जळगाव

'नव्या जगांत' गेलेल्या आपल्याबंधूंनी सध्या अभ्यासांत गुंतल्यामुळे प्रवासवर्णनाला स्वल्पविराम दिला आहे.....तेथील अध्ययन अध्यापन व सहजीवन यांवरील उत्तरार्धहि तेवढाच मनोरंजक व उद्‌बोधक उतरेल याची खात्री आहे. कांही मध्यन्तर गेल्यावर तो सुरू होईल असें वाटतें.

दि. २४–९–६२ (प्रा.) दा. ल. अडोणी, सागर

आपल्या संपादकत्वाखाली निघत असलेले 'युगवाणी'चे अंक अनेक दृष्टींनी वाचनीय व माहितीच्या दृष्टीने उद्‌बोधक वाटतात. प्रा. गो. मा. कुलकर्णी यांचे लेख अमेरिकेतील प्रत्यक्ष माहितीच्या दृष्टीने व निरनिराळ्या स्थलांचा परिचय वगैरे दृष्टीने मोठे उद्‌बोधक असतात. अमेरिकेंतील स्त्री पुरुषांचा भारतीयांकडे पहाण्याचा दृष्टिकोन व वागणुक यांच्या संबंधीहि, त्या लेखांतून उत्तम माहिती मिळते....तरी कृपाकरून त्यांचे लेख आपण 'युगवाणीतून अगत्याने प्रसिद्ध करावे अशी माझी आपणांस नम्र सूचना आहे. क. लोभवृद्धि व्हावी.

बुटीवाडा–सिताबर्डी –ज. रा. जोशी.
नागपूर. दि. ३०–१०–६२

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

–प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस
वि. सा. संघ यांजकडून–

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

वि. सा. संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या वतीने दि. १–११–६२ ते ६–११–६२ व १२–११–६२ पर्यंत "दिग्विजयी भारताच्या राजनीतिशास्त्राचा प्रणेता आर्य चाणक्य" या विषयावर म. म. साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांची वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात सात व्याख्याने झाली.

अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. मॅक्स ब्लॅक यांचे गुरुवार दि. ८–११–६२ रोजी सायंकाळी ७ वाजता गडकरी सभागृहात The Importance of Language (भाषेचे महत्व) या विषयावर भाषण झाले.

नाटय समिति–

वि. सा. संघाच्या नाटय समितीने लहानमुलांसाठी श्रीमती सई परांजपे लिखित "शेपटीचा शाप" आणि श्री. भा. आ. गुप्ते लिखित 'खंडोबल्लाळ' ह्या दोन नाटिकांचा प्रयोग वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात दि. १८–११–६२ रोजी दुपारी ४ वाजता सादर केला.

"शेपटीचा शाप" आणि 'खंडोबल्लाळ' ह्या नाटिकांचे दिग्दर्शन अनुक्रमे सौ. उपाबाई लिमये आणि श्री. किशोर कुळकर्णी यांनी केले. या प्रयोगाचे उत्पन्न खर्च वजाजाता रु. ५०१/– पंतप्रधानांच्या राष्ट्र संरक्षण निधीसाठी देण्यात आले. बालनाटयप्रयोगाचे उद्घाटन शिक्षणविभागाचे डेप्युटी डायरेक्टर श्री. चि. गो. सहस्रबुध्दे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी 'तरुणभारत' चे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी बालकलाकारांना आशीर्वाद देणारे भाषण केले.

दि. २५–११–६२ रोजी प्रस्तुत बालनाटिकांचा प्रयोग करण्यात आला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चित्रशाला समिति : "बालचित्रकला प्रदर्शन"

वि. सा. संघाच्या चित्रशाला समितीच्या वतीने गुरुवार दि. २९–११–६२ रोजी सायंकाळी ६-३० वाजता धनवटे रंगमंदिराच्या बाहेरील सज्जात "शंकर्स विकली" च्या सौजन्याने प्राप्त झालेल्या ५०० बालचित्रकारांच्या कलाकृति प्रदर्शित करण्यात आल्या. बाल चित्रकलाप्रदर्शनाचे उद्‌घाटन श्री. ना. रा. शेंडे, उपाध्यक्ष, वि. सा. संघ यांच्या हस्ते करण्यात आले. सुरुवातीला श्री. मधुकरराव पारळकर यांनी प्रदर्शनासंबंधी माहिती सांगितली. प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या कलाकृति निरनिराळ्या राष्ट्रातील बालचित्रकारांनी काढल्या होत्या. प्रदर्शन दि. २ डिसेंबर ६२ पर्यंत खुले ठेवण्यात आले होते.

शोकसभा

महर्षि धोंडो केशव उपाख्य अण्णासाहेब कर्वे यांच्या निधनानिमित्त रविवार दि ११–११–६२ रोजी सायंकाळी ६-३० वाजता दुखवट्याची सभा, श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याप्रसंगी सौ. सुभगाबाई काशीकर, सौ. उषाताई लिमये, सौ. कमलिनी पागे, सौ. उषाताई कोलते आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची महर्षि कर्वे यांच्या तपस्वी जीवन आणि कार्य यासंबंधी उदबोधक भाषणे झाली. यावेळी दुखवट्याचा ठराव मंजूर करण्यात आल्यावर महर्षींना श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली.

शाखावृत्त

यवतमाळ शाखा

वि. सा. संघाच्या यवतमाळ शाखेची सर्वसाधारण वार्षिक सभा झाली. ६२–६३ करिता खालील पदाधिकारी एकमताने निवडण्यात आले––

अध्यक्ष–श्री. शरच्चंद्र टोंगो, उपाध्यक्ष–सौ. मंगलाताई श्रीखंडे, चिटणीस–श्री. वि. के. पाटील, सहचिटणीस–श्री. गो. वा. देशपांडे, ऑडिटर–प्रा महाजन.

सभासद–श्री. व. ना एकबोटे, प्राचार्य ना. बा. पराडकर, श्री. रा. द. दामले, प्रा. राम डोके, डॉ गो. वा. पंडित, सौ. सुशीलाबाई पंडित, श्री. द. वा. महाजन, सौ. उषाताई दामले आणि श्री. उ. मा. ताजणे.

गोंडवन शाखा–(चांदा)

वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी दि. ११–१०–६२ रोजी शाखेला भेट दिली. यावेळी शाखेचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी श्री. ना. रा. शेंडे यांनी शाखेला उत्कृष्ट मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. तु. वि. पत्तीवार यांनी अल्पोपाहार दिला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे वादविवाद स्पर्धा

शाखेतर्फे कै. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे वादस्पर्धा, दि. १७–११–६२ रोजी 'युगवाणी' मासिकाचे संपादक प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली, घेण्यात आली.

या स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेले विजयचिन्ह "हिरेंद्रकुमार त्रिवेदी ढाल" यावेळी जनता महाविद्यालयाच्या चमूने जिंकली (श्री. दंदे, कु. फिरोज) असून उपविजयी "प्रताप" पुरस्कार मागील वर्षाप्रमाणे यंदाहि कन्यामहाशाळेच्या चमूने मिळविला. तसेच कु. फिरोज व कु. जोत्स्ना राजे यांना वैयक्तिक पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी सध्याच्या अश्लील वाङमयापासून डोळसपणाने जागरुक राहण्याचा मार्मिक इषारा, प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांनी भाषण करताना दिला.

काटोल शाखा–

शाखेतर्फे दि. ९–११–६२ रोजी खामगावच्या गो. से. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. के. मा. मुनशी यांचे "साहित्याचे–संस्कार" ह्या विषयावर भाषण झाले.

दि. २०–११–६२ रोजी नागपूरच्या गो. से. महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि साहित्यिक श्री. वा. कृ. चोरघडे यांनी शाखेला भेट दिली. यावेळी शाखे तर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले.

गोंदिया शाखा–

शाखेतर्फे दि. २१–११–६२ रोजी श्री. चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली भवभूति रंगमंदिरात श्री. लिमये वकील यांनी महर्षि धों. के. कर्वे यांच्या निधनानिमित्त भाषण करून श्रद्धांजलि अर्पण केली. यावेळी दुखवटयाचा ठराव मंजूर करण्यात आला.

संरक्षणमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण आणि महाराष्ट्र राज्याचे नवीन मुख्यमंत्री श्री. मा. सां. कन्नमवार यांचे अभिनंदन करणारे ठराव मंजूर करण्यात आले आणि त्या ठरावाची प्रत त्यांच्याकडे पाठविण्यात आली. यावेळी शाखे-तर्फे राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी मदत पाठविण्याची सूचना मांडण्यात आल्यावर उपस्थितांपैकी प्रत्येकाने खालीलप्रमाणे रक्कम देण्याचे आश्वासन दिले आणि त्याच बैठकीत पाऊणशेच्यावर रुपये जमा झाले.

श्री. व्यवहारे बंधु ५१ रु; सर्वश्री चौधरी, पागे, नाडकर्णी प्रत्येकी रु. ११ श्री. कमलाकर कुलकर्णी ६ रु. सर्वश्री लिमये वकील, श. अ. लिमये, भावे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एस्. बी. देशपांडे, तनखीवाले प्रत्येकी ५ रु; श्री. अत्रे ३ रु; आणि सर्वश्री पुराणकर, लोखंडे, वसंत देशपांडे, कृ. गो आकांत, ढवळे प्रत्येकी रु. २ वरील सर्व रक्कम प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांचेकडे पाठविण्यात येणार आहे.

विदर्भ साहित्य संघ: परीक्षा समिति

प्रतिवृत्त

केंद्राधिकाऱ्यांना सूचना :—

(१) आगामी परीक्षा दि. १९ व २० जानेवारी १९६३ ला होतील. त्याकरिता परीक्षार्थ्यांनी केंद्राधिकाऱ्यांकडे आवेदनपत्रें सशुल्क देण्याची तारीख २५ डिसेंबर ६२ आणि परीक्षा समिति वि. सा. संघ यांचेकडे पाठविण्याची शेवटची तारीख ३० डिसेंबर ६२ ही राहील.

(२) नवीन केंद्र सुरू करण्यासाठी केंद्र आवेदनपत्र भरून पाठविण्याची शेवटची तारीख २५ डिसेंबर ६२ ठेवण्यात येत असून केंद्राधिकाऱ्यांनी परीक्षार्थी आवेदनपत्रांची मागणी त्वरीत करावी, ही विनंती.

दि. १५–१२–६२
नागपूर

(प्रा.) माणिक के. बेंतुले
संचालक
परीक्षा समिति

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुं. म. ग्रंथसंग्रहालयाचे इतिहास संशोधन मंडळ

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळातर्फे आतापर्यंत निरनिराळ्या ऐतिहासिक विषयांवर व्याख्यानमाला करण्यात येत असे व ग्रंथ-प्रकाशनहि होत आले. या महिन्यापासून इतिहास संशोधन व इतिहासलेखन सशास्त्र करू इच्छिणाऱ्या अभ्यासूंना मार्गदर्शन करून देण्याची सोयहि मंडळाने केली आहे. इतिहास संशोधन मंडळाचे अध्यक्ष प्रा न. र. फाटक व डायरेक्टर वा. सी. बेन्द्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य होणार आहे. ज्या इतिहासा-भ्यासूंना या सोयीचा फायदा घ्यावयाचा असेल त्यांनी श्री. बेन्द्रे यांची कार्या-लयांत भेट घेऊन आपला अभ्यासक्रम ठरवून घ्यावा कोणत्याहि ऐतिहासिक विषयावर शास्त्रशुद्ध ग्रंथ तयार केल्यास व ते इतिहास संशोधन समितीने मंजूर केल्यास त्या ग्रंथाच्या प्रसिद्धीकरणाचीहि सोय मुं. म. ग्रंथसंग्रहालय करू शकेल. सामान्यपणे श्री. बेन्द्रे बुधवार, गुरुवार व शुक्रवार या तीन दिवशी सायंकाळी ४ ते ७ या वेळात संशोधन मंडळाच्या कार्यालयात (दुसरा मजला, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगाव क्रॉस रोड, दादर मुंबई १४) भेटू शकतील.

ऐतिहासिक महत्वाची कागदपत्रे, नाणी, कवितांची व इतर माहितीची वाडे, हस्तलिखित संस्कृत, मराठी, पर्शियन ग्रंथ, प्रेक्षणीय वस्तू वगैरे कोणाचे संग्रही असतील व त्यांचा इतिहासासाठी उपयोग करू देण्याची त्यांची इच्छा असेल तर ती श्री बेन्द्रे यांस दाखविण्याची व्यवस्था करावी. ते ती तपासून त्यांच्या उपयोगाबाबत योग्य ते मार्गदर्शन करतील. अशाप्रकारचे ऐतिहासिक महत्वाचे संग्रह सुरक्षित राखण्यासाठी संस्थेकडे द्यावयाचे असतील तर ते मंडळाच्या संग्रहात कायम ठेव म्हणून स्वीकारले जातील व त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारीहि घेतली जाईल. महाराष्ट्रीय घराण्यातील मराठ्यांच्या इतिहासाची साधने एकत्रित करण्याचे मनावर घेतले तर मराठा-स्वराज्याचा उज्वल व सत्य इतिहास तयार होण्यास फार अवधि लागणार नाही. या कार्याकडे ठिकठिकाणच्या स्थानिक पुढारी मंडळींनी लक्ष घातले पाहिजे व खेड्यापाड्यातील लोकांची समजूत करून देऊन महाराष्ट्राच्या इतिहासाची साधने कालौघात नाश पावण्या-पूर्वी स्वदेशाच्या इतिहासास उपयोगार्थ देण्याइतकी त्यांची सहानुभूति मिळविली पाहिजे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके		रु. पैसे
✠ १	निबंध परिमल	२–२५
२	सुमन संचय	१–२५
† ३	मराठी गद्य ...	१–५०
† ४	अंमलदार (नाटक) पु ल. देशपांडे	२–००
५	भारती (नाटक) नाना जोग ...	१–५०
६	हिंदी मराठी भाषा प्रवेशिका —मालतीबाई श्रीखंडे	१–२५
७	कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह भाग २	३–००
८	The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans–(पूर्ण ग्रंथ) ले. कै. डॉ. तु. ज. केदार	३–००
९	" " " (केवळ भाग ४)	१–५०
१०	डॉ. केदार यांचे चरित्र —ले. ज. रा. जोशी	५–००
✤११	आनंदगीत भाग ४ था –कवि श्री. आनंदराव टेकाडे	८–००
*१२	प्रयोगक्षम मराठी नाटकें –डॉ. मु श्री. कानडे (सूचि ग्रंथ)	१५–००
१३	पयोष्णी (कविता संग्रह) –कवि श्री. ज्ञा. रा. साधु	१–२५
कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध		
१४	वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन –डॉ. मा. गो. देशमुख	०–३१
*१५	नाटककार गडकरी –द. रा. गोमकाळे	०–३१
*१६	गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार–कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
*१७	गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत–प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
*१८	सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल –द. वि. तेंडूलकर	०–५०
*१९	गडकऱ्यांची खरी भूमिका –प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
*२०	गडकऱ्यांची नाट्यशैली –प्रा. रू. पां. पांजणकर	०–५०
*२१	गडकऱ्यांची नाट्यप्रकृति व नाट्यसृष्टि–वसंत वरखेडकर	०–६०
मासिकें		
२२	युगवाणी मासिक (वि. सा. संघाचे मुखपत्र) वार्षिक वर्गणी	५–००
२३	युगवाणी नाट्यसंमेलन विशेषांक डिसेंबर १९५८	३–००
२४	युगवाणी ४४ वे मराठी नाट्यसंमेलन विशेषांक, एप्रिल १९६२	१–००

✠ ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन, नागपूर यांचेकडे आहेत.

† ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत.

✤ ह्या पुस्तकांच्या विक्रीचे अधिकार जयश्री प्रकाशन, धरमपेठ विस्तार, यांचेकडे आहेत.

* ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार, व्हीनस प्रकाशन, ४१० शनवार पुणें २ यांचेकडे आहेत.

वाकीची सर्व पुस्तके वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ या पत्त्यावर मिळतील.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा, संघाचे श्रीशिवाजी ग्रंथालय–



देणगीदारांना विनंती

विदर्भ साहित्य संघाच्या श्रीशिवाजी ग्रंथालयाकरिता नागपूरचे दानशूर श्रीमंत पु. वा. काळे यांनी रुपये पंचेवीस हजारांची देणगी देऊन संस्थेला उपकृत केले आहे. या ग्रंथालयाचे आतापर्यंत निम्मे बांधकाम होत आले असून संपूर्ण बांधकाम येत्या सहा महिन्यात पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे. एकंदर बांधकामाकरिता अंदाजे दीड लाख रुपये खर्च येईल. बांधकाम पूर्ण होण्याच्या दृष्टीने दात्यांनी जास्तीत जास्त मदत करावी, ही आग्रहाची विनंती आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दि. १२-९-६२ रोजी. "आधुनिक मराठी साहित्याची वाटचाल" या विषयावर परिसंवाद सुरू असतांना घेण्यात आलेले छायाचित्र श्री. वि. द. घाटे भाषण करीत आहेत-



उजवीकडून-प्रा. अनंत काणेकर, प्रा. श्री. गो. काशीकर, श्री. आ. रा. देशपांडे, श्री. मामासाहेब वरेरकर, श्री. वि. द. घाटे (भाषण देत आहेत) प्रा. दि. के. बेडेकर व डॉ. प्रभाकर माचवे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



छायाचित्र—गोडबोले आर्टस्

दि. २३-९-६२ रोजी वक्षीस समारंभाचे वेळी घेण्यात आलेले छायाचित्र—
डावीकडून—श्री. ना. रा. शेंडे (उपाध्यक्ष) न्या. मू. ग. ब. वडकस (समारंभाचे अध्यक्ष) कु. प्रभा गणोरकर आणि श्री. तारानाथ मेश्राम रौप्य [illegible] स्वीकारतांना.

भाऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय
30324
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 11.2.94
96
साहित्य संघ, नागपूर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ